- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,२२,७०० /-
✔ २२ कॅरेट : १,१२,३५० /-
✔ चांदी : १,५८,३००/-

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर • संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 Mail Id : sinhvanivrutta@gmail.com दिनांक : रविवार, २२ नोव्हेंबर २०२६ Epaper : epaper.sinhvani.com पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३४२ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

गोशाळांच्या जमिनीचे व्यवहार आता कृषी दरानेच

अधिकृत गो शाळांना २५ लाखांचे अनुदान, गोवंश संवर्धनासाठी शासनाचा पुढाकार, रोख व्यवहारांची माहिती दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत आयकर विभागाला देणे बंधनकारक : महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

गोशाळांसाठी घेतलेल्या जमिनींचे व्यवहार निवासी किंवा औद्योगिक दराने न होता कृषी दरानेच होतील. तसेच जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) माध्यमातून अधिकृत गोशाळांना २५ लाख रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला.

राज्यातील गोशाळांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि गोवंश संवर्धनाला बळ देण्यासाठी शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. गोवंशाची कत्तलीपासून सुटका करून त्यांचे संगोपन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य गोशाळा करतात. अशा गोशाळांना जनावरांसाठी चारा उपलब्ध करून देणे, चारा लागवड करणे आणि जनावरांचे संगोपन करणे यासाठी मोठा खर्च करावा लागतो. त्यामुळे हा केवळ व्यवसाय नसून सेवाभाव आहे. या सेवाभावी कार्याला शासनाने अनुदानाच्या माध्यमातून मदत केली पाहिजे, अशी सरकारची भूमिका आहे.

गोशाळांसाठी यापूर्वी जमिनीचे व्यवहार करताना निवासी किंवा औद्योगिक दर आकारले जात होते. मात्र, गोशाळांचा उपयोग हा कृषी आणि चारा लागवडीसाठी होत असल्याने यापुढे गोशाळांसाठी घेतलेल्या जमिनींचे व्यवहार कृषी दरानेच होतील. याबाबत शासनाने स्पष्ट भूमिका घेतली आहे. अधिकृत गोशाळांना जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) माध्यमातून २५ लाख रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णयही घेतला आहे. त्यामुळे गोशाळांचे काम आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि शाश्वत होण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.



गोवंशाची अवैध खरेदी-विक्री करणाऱ्यांवर कारवाई

राज्यात गोवंशाची अवैध खरेदी-विक्री आणि कत्तलीसाठी होणाऱ्या वाहतुकीच्या घटनांवर शासन कठोर कारवाई करणार आहे. दुष्काळाच्या परिस्थितीचा फायदा घेत काही लोक शेतकऱ्यांना जनावरे विकण्यासाठी प्रवृत्त करत आहेत. मात्र, जनावरांच्या संगोपनाची जबाबदारी शासन आणि गोशाळांनी स्वीकारली आहे. चारा लागवड, चारा उपलब्धता आणि गोवंश संगोपनासाठी आवश्यक व्यवस्था केली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी दुष्काळाच्या भीतीपोटी आपला गोवंश विकू नये, असे आवाहन बावनकुळे यांनी केले.

गोवंशाची अवैध खरेदी करणारे, कत्तलीसाठी जनावरे विकत घेणारे आणि कत्तलीत सहभागी असणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. अशा प्रवृत्तींना आळा घालून गोवंशाचे संरक्षण करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मी स्वतः आणि मंत्रिमंडळ उपसमिती या विषयावर काम करत असून राज्यातील प्रत्येक गोशाळा अधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

तीन वर्षे पडीत ठेवलेली जमीन सरकारजमा करण्याचा विचार

राज्यातील खरीप पेरणीचे प्रमाण ऐतिहासिकदृष्ट्या कमी झाल्याच्या आकडेवारीवर प्रतिक्रिया देताना बावनकुळे यांनी पावसाअभावी खरीप पेरणीवर मोठा परिणाम झाल्याचे मान्य केले. पाऊसच पुरेसा नसल्याने यंदा पेरणी कमी झाली आहे. मात्र, आगामी काळात ज्या भागात पुरेसा पाऊस आणि पाणी उपलब्ध असेल, तेथे शेतकऱ्यांनी जमीन पडीत ठेवू नये, असे आवाहन त्यांनी केले.

काही मोठ्या व्यापाऱ्यांनी आणि व्यावसायिकांनी शेतीच्या उद्देशाने मोठ्या प्रमाणावर जमिनी खरेदी केल्या आहेत. मात्र, १००, २००, ४०० एकर अशा मोठ्या क्षेत्रावरील जमिनी अनेक वर्षांपासून पडीत ठेवल्या जात आहेत. काही ठिकाणी केवळ भविष्यातील फायद्यासाठी जमिनींचा साठा म्हणजेच लँड बँक तयार करण्याचा प्रकार सुरू आहे. पावसाअभावी किंवा दुष्काळामुळे जमीन पडीत राहणे वेगळे; मात्र पाणी आणि पावसाची उपलब्धता असतानाही केवळ लँड बँक तयार करण्यासाठी जमीन शेतीविना ठेवणे योग्य नाही, असे बावनकुळे म्हणाले.

यंदा पुरेसा पाऊस न झाल्यामुळे खरीप हंगामातील पेरणीचे प्रमाण कमी झाले आहे. मात्र, ज्या भागात पाऊस पुरेसा झाला आहे, तेथे शेतकऱ्यांनी जमीन पडीक ठेवू नये, असे आवाहन बावनकुळे यांनी केले.

काही मोठ्या व्यापाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात शेतजमिनी खरेदी करून त्या पडीक ठेवल्याचे निदर्शनास आले आहे. नियमानुसार तीन वर्षांपेक्षा अधिक काळ जमीन पडीक ठेवता येत नाही. सलग तीन वर्षे जमीन शेतीसाठी वापरात न आणल्यास ती शासनाकडे जमा करण्याची तरतूद कायद्यात आहे. या कायद्याची आगामी काळात प्रभावी अंमलबजावणी करावी लागेल, असे संकेत त्यांनी दिले.

नियमानुसार तीन वर्षांपेक्षा अधिक काळ जमीन पडीत ठेवण्याबाबत निर्बंध आहेत. त्यामुळे तीन वर्षांत शेतीच्या उपयोगासाठी जमीन आणली नाही, तर अशी जमीन सरकारजमा करण्याचा कायदाही भविष्यात लागू करण्याचा विचार करावा लागेल, असे संकेत चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

रोख व्यवहारांची माहिती दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत आयकर विभागाला देणे बंधनकारक

राज्यातील जमीन खरेदी-विक्री आणि नोंदणी व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी महसूल विभागाने महत्त्वपूर्ण सुधारणा केली आहे. यापुढे दोन लाख रुपयांपर्यंतच्या रोख व्यवहारांसह संबंधित आर्थिक व्यवहारांची माहिती दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत आयकर विभागाला कळविणे बंधनकारक करण्यात आले आहे. या प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची दिरंगाई किंवा लपवाछपवी खपवून घेतली जाणार नाही. नियमांचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा बावनकुळे यांनी दिला.

नागपूर, नाशिक आणि पुणे येथे नोंदणी व्यवहारांशी संबंधित आर्थिक माहिती आयकर विभागाला नियमितपणे कळविणे अपेक्षित असते. मात्र, अनेक ठिकाणी ३० ते ५० लाख रुपयांपर्यंतच्या व्यवहारांची माहिती वेळेवर पाठविण्यात आली नाही. काही प्रकरणांमध्ये तीन ते सहा महिन्यांच्या विलंबाने माहिती पाठविण्यात आल्याने संशयाचे वातावरण निर्माण झाले. त्यामुळे आता स्टेटमेंट ऑफ फायनान्शियल ट्रान्झॅक्शन्स (एसएफटी) अहवालाच्या प्रक्रियेत सुधारणा करण्यात आली आहे.

संयुक्त खरेदी, रोख खरेदी आणि अन्य संबंधित व्यवहारांची माहिती वेळेत आयकर विभागाला देणे आवश्यक आहे. नोंदणी महानिरीक्षक विभाग महसूल खात्याच्या अखत्यारीत येत असून, या विभागामार्फत सुमारे ७५ हजार कोटी रुपयांचे व्यवहार होतात. शासनाच्या महसुलाचे नुकसान होऊ नये आणि आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता राहावी, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत माहिती सादर करणे बंधनकारक असून, त्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

थोडक्यात

साखरेचा पुन्हा भडका!

मुंबई : साखर महागल्याने सर्वसामान्यांचे बजेट कोलमडले आहे. सण नसतानाही देशातील प्रमुख शहरांमध्ये साखरेचे दर ६०-७० रुपये प्रति किलोपर्यंत पोहोचले आहेत. गेल्या एका वर्षात किमती ३० टक्के वाढल्या आहेत. सरकारचे नियंत्रण, प्रवन आणि उपाययोजना निष्प्रभ ठरत आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारभाव वाढ हेदेखील एक प्रमुख कारण आहे, ज्यामुळे सामान्य नागरिकांना दिलासा मिळण्याची चिन्हे नाहीत. सण-उत्सव नसतानाही साखर महागली आहे. गेल्या काही महिन्यांपासून साखर सातत्याने महाग होत आहे. सर्वांत धक्कादायक बाब म्हणजे साखरेचे भाव नियंत्रणात आणण्यासाठी केंद्र सरकारने पावले उचलूनही साखरेचे दर गगनाला भिडताना दिसत आहेत. देशातील अनेक मोठ्या शहरांमध्ये पुन्हा एकदा साखर ६० ते ७० रुपये किलोने विकली जात आहे. त्यामुळे गृहिणींचे बजेट कोलमडणार आहे. देशाच्या वेगवेगळ्या महानगरांत आणि मोठ्या शहरांमध्ये साखरेचे दर वाढत असल्याने सामान्य नागरिकांच्या खिशाला झळ बसत आहे. कोलकात्यातील लोकांना याचा सर्वाधिक फटका बसला आहे. कोलकात्यात साखरेचे दर ७० रुपये किलोवर गेले आहेत. तर राजधानी दिल्लीत ६४ रुपये किलोने साखर विकली जात आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत आणि झारखंडची राजधानी असलेल्या रांचीमध्ये एकसमान परिस्थिती आहे. या दोन्ही महत्त्वाच्या शहरांमध्ये साखर ६३ रुपये किलोने विकली जात आहे.

मंत्रालयातील लिपिकांचा वेतनवाढीसाठी 'कामबंद' आंदोलनाचा इशारा

मुंबई : राज्याच्या प्रशासकीय व्यवस्थेचे सर्वोच्च केंद्र असलेल्या मंत्रालयातील कामकाज आगामी काळात ठप्प होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वेतनश्रेणी सुधारणा आणि पदनाम बदलाच्या दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या मागण्यांकडे शासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत मंत्रालयीन लिपिक संवर्गाने आता थेट आंदोलनाचे हत्यार उपसले आहे.

संघटनेच्या वतीने त्यांच्या मागण्यांसाठी १८ नोव्हेंबर रोजी मंत्रालयातील आरसा गेटवर मोठं आंदोलन करण्यात आलं. आता शासनाने सकारात्मक निर्णय न घेतल्यास २५ नोव्हेंबर पासून बेमुदत कामबंद आंदोलन छेडले जाईल, असा सज्जड इशारा संघटनेने दिला आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कठीण परीक्षा टप्प्यांतून निवड झालेले हे कर्मचारी मंत्रिमंडळ व विधिमंडळ कामकाज, धोरणात्मक निर्णय, न्यायालयीन प्रकरणे आणि शासन निर्णयांचे गोपनीय मसुदे तयार करण्याची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी पार पाडतात. मात्र, त्यांना मिळणारे वेतन अत्यंत तुटपुंजे असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. मुंबईसारख्या महागड्या महानगरात नव्याने रुजू होणाऱ्या लिपिकाला साधारणतः ३५,००० रुपये वेतन मिळते. घरभाडे, मुलांचे शिक्षण, कुटुंबाचा उदरनिर्वाह आणि मुंबईतील प्रवासखर्च पाहता हे वेतन अत्यंत अपुरे ठरत असून कर्मचाऱ्यांचे आर्थिक आणि मानसिक स्वास्थ्य धोक्यात आल्याचं मत संघटनेनं व्यक्त केलं आहे. वेतनवाढ होत नसल्याने अनेक तरुण कर्मचारी मंत्रालयातील नोकरी सोडून जिल्हास्तरीय सेवांकडे वळत आहेत. परिणामी, मंत्रालयातील सुमारे ४० टक्के लिपिक पदे रिक्त असून कार्यरत कर्मचाऱ्यांवर कामाचा प्रचंड ताण पडत असल्याचं मत संघटनेचं आहे. वस्तू व सेवा कर विभागातील कर सहायक, मुंबई महापालिका, उच्च न्यायालय आणि विधानमंडळातील समकक्ष पदांच्या वेतनश्रेणीत आणि पदनामात सुधारणा करण्यात आली आहे. मग मंत्रालयीन लिपिकांवरच हा अन्याय का, असा सवाल विचारला जात आहे. चौथ्या वेतन आयोगापासूनची वेतनविसंगती कायम असून सातव्या वेतन आयोगातील बक्षी समितीच्या शिफारशींचीही अद्याप अंमलबजावणी झालेली नाही, असेही संघटनेने म्हटले आहे.

'नीट पेपरफुटी' प्रकरणात १४ आरोपींविरोधात आरोप निश्चित

नवी दिल्ली : देशभरात गाजलेल्या नीट पेपरफुटीचं केंद्रस्थान महाराष्ट्र निघाले होते. वैद्यकीय प्रवेश परीक्षेसाठी घेण्यात येणाऱ्या या नीट परीक्षेच्या पेपरफुटीचा तपास सीबीआयकडे देण्यात आला असून सीबीआयनेही धडाडीने कारवाई करत १४ आरोपींना अटक केली आहे. विशेष म्हणजे, नाशिक, पुणे आणि लातूरमधून सर्वांना अटक करण्यात आली होती. त्यामध्ये, लातूरमधील प्रसिद्ध मोटेगावकर क्लासेसच्या संचालकांनाही अटक करण्यात आली आहे. आता, याप्रकरणी न्यायालयात सर्वच १४ आरोपींवर आरोप निश्चित करण्यात आले असून २५ नोव्हेंबरपासून खटला सुरू होणार आहे.

नीट पेपरफुटी प्रकरणात अटकेत असलेल्या सर्वच १४ आरोपींविरोधात न्यायालयाने औपचारिक आरोप निश्चित केले आहेत. मात्र, सर्व आरोपींनी आरोप मान्य करण्यास नकार देत खटल्याला सामोरे जाण्याची भूमिका घेतली. त्यामुळे, याप्रकरणी २५ नोव्हेंबरपासून खटल्याला सुरुवात होणार आहे. आरोप निश्चित करण्यात आलेल्या कलमांमध्ये फसवणूक, विश्वासघात, भ्रष्टाचार आणि परीक्षेतील गैरप्रकारांशी संबंधित तरतुदींचा समावेश आहे. नॅशनल टेस्टींग एजन्सी म्हणजेच एनटीएशी तज्ज्ञ म्हणून संबंधित असलेल्या मनीषा गुरुनाथ मांदरे, पी. व्ही. कुलकर्णी आणि मनीषा संजय हवालदार यांच्याविरोधात सार्वजनिक सेवक या नात्याने भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गतही आरोप निश्चित करण्यात आले आहेत. त्यामुळे, देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या या नीट पेपरफुटी घोटाळ्याच्या खटल्यात न्यायालयात काय काय युक्तिवाद केला जातात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

देशभरात 'मायक्रोमिनी' वजनकाट्यांचा सुळसुळाट!

पारंपरिक वजनकाटा उद्योग संकटात; केंद्र व राज्य सरकारने तातडीने कारवाई करावी, "मायक्रो मिनी काटा हद्दपार झालाच पाहिजे"

मायक्रोमिनी टेबल टॉप, चिकन स्केल, फार्मर्स स्केल आणि पोर्टेबल स्केलच्या नावाखाली नियमबाह्य वजनकाट्यांची बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात विक्री? गुजरातमधून होणाऱ्या पुरवठ्याची चौकशी करण्याची मागणी

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

देशभरातील वजनकाटा उद्योगासमोर सध्या एक गंभीर समस्या निर्माण झाली असून, मायक्रोमिनी या नावाने बाजारपेठेत विक्री होणाऱ्या छोट्या आकाराच्या वजनकाट्यांमुळे पारंपरिक वजनकाटा उद्योगाचे अस्तित्व धोक्यात आले आहे. टेबल टॉप, चिकन स्केल, फार्मर्स स्केल आणि पोर्टेबल स्केल अशा वेगवेगळ्या नावांनी बाजारपेठेत विकले जाणारे हे वजनकाटे नेमके कोणत्या मंजूर मॉडेलच्या आधारे तयार केले जातात, त्यांची कायदेशीर क्षमता किती आहे आणि त्यांची पडताळणी व मुद्रांकन कोणत्या नियमांनुसार केले जाते, असे अनेक गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

विशेष म्हणजे, मायक्रोमिनी नावाने विकल्या जाणाऱ्या काही वजनकाट्यांची क्षमता ३० किलोपर्यंत दर्शविली जाते; मात्र त्यांचा आकार इतका लहान असतो की त्यावर प्रत्यक्षात १ किलो वजनसुद्धा व्यवस्थित मोजता येईल का, याबाबत शंका निर्माण होते. या वजनकाट्यांवर उत्पादकाचे नाव, ब्रँड, मॉडेलची माहिती, आवश्यक कायदेशीर तपशील किंवा वैध पडताळणी मुद्रांक नसल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत. असे वजनकाटे देशभरातील बाजारपेठेत सरांस विकले जात असल्याचे निदर्शनास येत आहे.

गुजरातमधून पुरवठा, महाराष्ट्रात खुलेआम विक्री?

मिळालेल्या माहितीनुसार, या प्रकाराचे अनेक वजनकाटे गुजरातमधून आणून महाराष्ट्रासह आणि देशातील विविध राज्यांमध्ये विक्रीसाठी पाठविले जात असल्याचा आरोप आहे. काही विक्रेते या वजनकाट्यांना वेगवेगळे ब्रँड लावून बाजारात विक्री करीत असल्याचीही चर्चा आहे. भाजी विक्रेते, किराणा दुकानदार, फळविक्रेते आणि इतर किरकोळ व्यापाऱ्यांकडून या वजनकाट्यांचा वापर केला जात आहे.

विशेष म्हणजे, या वजनकाट्यांची बाजारातील किंमत केवळ ५०० ते ७०० रुपयांच्या आसपास असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून, मान्यताप्राप्त मॉडेलनुसार वजनकाट्यांचे उत्पादन व विक्री करणाऱ्या उत्पादक आणि परवानाधारक व्यावसायिकां समोर मोठे आर्थिक संकट निर्माण झाले आहे.

चिकन स्केल आणि फार्मर्स स्केलच्या नावाखाली नियमांचा गैरवापर?

याहून गंभीर बाब म्हणजे चिकन स्केल आणि फार्मर्स स्केल या नावाने बाजारात विक्री होणाऱ्या वजनकाट्यांची क्षमता काही ठिकाणी २०० किलोपर्यंत दर्शविली जात आहे. अशा वजनकाट्यांचे मॉडेल वर्गीकरण, मंजूर क्षमता आणि वापरासंबंधीचे नियम तपासणे अत्यंत आवश्यक आहे.



जर संबंधित वजनकाटा मंजूर मॉडेलनुसार टेबल टॉप प्रकारात येत असेल आणि त्या प्रकारासाठी लागू असलेली कमाल क्षमता ५० किलो असेल, तर ५० किलोपेक्षा अधिक क्षमतेच्या वजनकाट्यांना चिकन स्केल, फार्मर्स स्केल किंवा पोर्टेबल स्केल अशी वेगवेगळी नावे देऊन बाजारात विक्री करणे अथवा त्यांची पडताळणी व मुद्रांकन करणे कायदेशीरदृष्ट्या योग्य आहे का, हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे.

केवळ वजनकाट्याचे नाव बदलल्याने त्याचे कायदेशीर वर्गीकरण बदलू शकते का? एखाद्या वजनकाट्याला मंजूर मॉडेलच्या अटी लागू होत नसतील, तर त्याची पडताळणी व मुद्रांकन कोणत्या आधारावर केले जाते? या सर्व बाबींची केंद्र सरकारच्या वैध मापनशास्त्र विभागाने आणि राज्यातील संबंधित अधिकाऱ्यांनी सखोल तपासणी करणे गरजेचे आहे.

कायदेशीर उद्योगाला फटका; बेकायदेशीर बाजारपेठेला प्रोत्साहन?

वजनकाटा उद्योगात अनेक वर्षांपासून उत्पादक, वितरक, विक्रेते आणि परवानाधारक व्यावसायिक कायदेशीर नियमांचे पालन करून व्यवसाय करीत आहेत. मॉडेल मंजुरी, उत्पादन परवाना, विक्री परवाना, पडताळणी आणि मुद्रांकन अशा विविध प्रक्रियांमधून जाऊन त्यांना व्यवसाय करावा लागतो. मात्र दुसरीकडे अत्यंत कमी किमतीत उपलब्ध होणारे आणि आवश्यक कायदेशीर निकषांची पूर्तता न करणारे वजनकाटे बाजारपेठेत उपलब्ध होत असतील, तर नियमांचे पालन करणाऱ्या व्यावसायिकांवर अन्याय होत नाही का? या परिस्थितीमुळे पारंपरिक वजनकाटा उद्योगाची मागणी कमी होत असून, अनेक उत्पादक आणि व्यावसायिकांच्या व्यवसायावर विपरीत परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. अशा प्रकारच्या वजनकाट्यांमुळे ग्राहकांच्या अचूक वजनाच्या हक्कावरही परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

केंद्र व राज्य सरकारने तातडीने हस्तक्षेप करावा

या संपूर्ण प्रकरणाची केंद्र सरकारच्या ग्राहक व्यवहार मंत्रालयाने, वैध मापनशास्त्र विभागाने तसेच महाराष्ट्र शासनाच्या वैध मापनशास्त्र विभागाने संयुक्तपणे चौकशी करावी, अशी मागणी वजनकाटा उद्योगातील व्यावसायिकांकडून केली जात आहे.

प्रामुख्याने पुढील बाबींवर तातडीने कार्यवाही होणे आवश्यक आहे:

१. मायक्रोमिनी नावाने विकल्या जाणाऱ्या वजनकाट्यांचे मूळ उत्पादक, मॉडेल मंजुरी आणि कायदेशीर वर्गीकरण तपासण्यात यावे.

२. गुजरातमधून महाराष्ट्रासह देशभरात होणाऱ्या अशा वजनकाट्यांच्या पुरवठ्याची सखोल चौकशी करावी.

३. टेबल टॉप, चिकन स्केल, फार्मर्स स्केल आणि पोर्टेबल स्केल यांच्या नावाखाली विक्री होणाऱ्या वजनकाट्यांची मंजूर मॉडेल आणि क्षमतेनुसार तपासणी करावी.

४. मॉडेल मंजुरी, उत्पादक परवाना आणि पडताळणी मुद्रांकनासंबंधीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी.

५. बेकायदेशीर किंवा आवश्यक कायदेशीर मान्यता नसलेल्या वजनकाट्यांची विक्री व वापर रोखण्यासाठी देशव्यापी तपासणी मोहीम राबवावी.

६. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून व्यवसाय करणाऱ्या उत्पादक, वितरक आणि परवानाधारक व्यावसायिकांना संरक्षण द्यावे.

देशात वजन आणि मापांच्या अचूकतेसाठी स्वतंत्र वैध मापनशास्त्र विभाग कार्यरत असताना, मायक्रोमिनी आणि इतर नावांनी विकल्या जाणाऱ्या अशा वजनकाट्यांची बाजारपेठ इतक्या मोठ्या प्रमाणात कशी वाढत आहे? त्यांना मॉडेल मंजुरी कोणी दिली? त्यांची पडताळणी व मुद्रांकन कोणत्या कायदेशीर आधारावर केले जाते? आणि जर हे वजनकाटे नियमबाह्य असतील, तर त्यांच्यावर कारवाई का होत नाही? आता तरी केंद्र सरकार आणि राज्य सरकारने या गंभीर विषयाची दखल घेऊन देशभरातील वजनकाटा बाजारपेठेचे सर्वेक्षण करावे. कायद्याचे पालन करणाऱ्या व्यावसायिकांचे हित जपण्याबरोबरच ग्राहकांची फसवणूक रोखण्यासाठी आवश्यक ती कठोर कारवाई करावी. अन्यथा स्वस्त आणि नियमबाह्य वजनकाट्यांच्या स्पर्धेत कायदेशीर वजनकाटा उद्योग उद्धवस्त होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

संपादकीय लेखणीतून...

घसरणीचे सोने

गुरुवारी सोने-चांदीच्या दरात मोठी घसरण झाली. बुधवारी सोन्याचे दर १ लाख ३२ हजार रुपये होते ते गुरुवारी दोन हजार रुपयांनी घसरून १ लाख ३० हजारांवर आले. चांदीच्या बुधवारच्या दरात पाच हजार रुपयांची घसरण होऊन ती १ लाख ६९ हजार वरून १ लाख ६४ हजार रुपयांवर खाली आली. त्यामुळे विवाह सोहळ्यासाठी सोने-चांदीची खरेदी करण्याच्या तयारीत असणाऱ्या लोकांना नोव्हेंबर महिना दिलासादायक ठरत आहे. गत काही दिवसांपासून सोने-चांदीच्या किमतीमध्ये सातत्याने घसरण पहावयास मिळत आहे. चांदी सुमारे १३ दिवसांत २५ हजार रुपयांपर्यंत स्वस्त झाली आहे, तर सोन्याच्या भावातही सुमारे ६ टक्क्यांची घसरण झाली आहे. बुधवारी दिल्लीच्या सराफा बाजारात सोने सलग सहाव्या सत्रात स्वस्त झाले. चांदीची किंमत एका वर्षाच्या नीचांकी पातळीवर पोहोचली. चांदीच्या किमतीत गत काही दिवसांत मोठी घसरण झाली. चांदीसोबतच सोन्याची चमकही कमी होत आहे.

बुधवारी ९९.९ टक्के शुद्धतेचे सोने १,४०० रुपयांनी घसरून १ लाख ३८ हजार ६०० रुपये प्रति १० ग्रॅमवर आले. ९ नोव्हेंबरपासून आतापर्यंत सोन्याची किंमत ८३०० रुपये म्हणजेच सुमारे ६ टक्क्यांनी घसरली आहे. डिसेंबरमध्येही सोने आणि चांदीच्या दरात चढ-उतार कायम राहू शकतो. जर अमेरिकन फेडरल रिझर्व्हने व्याजदर वाढवण्याचे संकेत दिले आणि डॉलर मजबूत राहिला, तर मौल्यवान धातूंवरील दबाव आणखी वाढू शकतो. डिसेंबरमध्ये सोने-चांदी सातत्याने स्वस्तच राहील असे नाही. जर आंतरराष्ट्रीय बाजारात मागणी वाढली, डॉलर कमकुवत झाला किंवा गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणुकीचा पर्याय म्हणून सोन्याकडे वळले, तर पुन्हा तेजीही येऊ शकते. मागील काही दिवसांपासून सोन्या-चांदीच्या किमतीमध्ये मोठी घसरण होताना दिसत आहे. इराण-अमेरिका युद्ध सुरू होण्यापूर्वी सोन्याचे भाव जवळपास २ लाखाच्या आसपास होते. मात्र, युद्धाला सुरुवात झाली आणि सोन्या-चांदीचे भाव कोसळले. सोन्याच्या भावात मोठी घसरण झाली. जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीमध्ये मोठी वाढ होत आहे तर दुसरीकडे सोन्याचे भाव कोसळत आहेत. सोन्याचे भाव वधारतील असा अंदाज होता,

मात्र, प्रत्यक्षात उलटे घडले. सोन्या-चांदीच्या किमती ज्याप्रमाणे घसरत आहेत, त्याला अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प कारणीभूत आहेत का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. मध्यंतरी सोन्याचे दर वधारले होते. मात्र त्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर मोठे हल्ले सुरू करणार असल्याची घोषणा केली आणि सोन्याचे दर कोसळताना दिसले. अमेरिकेत महागाई वाढली आहे आणि ती लवकर कमी होईल असे वाटत नाही. ट्रम्प यांच्यामुळे सोने-चांदीच्या किमती कमी झाल्या आहेत असे लोकांना वाटते. अमेरिकेत वाढलेल्या महागाईने सोने-चांदीच्या किमती कमी झाल्याचे बोलले जात आहे. सोने-चांदीच्या किमती कमी होण्यामागे अनेक कारणे आहेत. जेव्हा बाजारात एखाद्या वस्तूचा तुटवडा असतो परंतु खरेदीदार मात्र अनेक असतात, तेव्हा खरेदीदार ती वस्तू अधिक किमतीत विकत घेण्यास तयार असतात, त्यामुळे त्या वस्तूची किंमत वाढते. भारत सरकारने ग्राहकांनी अधिकचे सोने खरेदी करू नये म्हणून ड्युटीत मोठी वाढ केली, तरीही भारतात सोन्याची मागणी आहे. सध्या सोन्याच्या दरातील घसरणीमुळे लग्नसराईतील खरेदीदारांना दिलासा मिळू शकतो. चांदीची चमकही कमी होत आहे.

भारतात तुलसीविवाहानंतर लग्नसराईला प्रारंभ होतो. यंदा एकूण ५४ विवाहमुहूर्त आहेत म्हणे. यंदाच्या वर्षात सोने-चांदीच्या दरांनी गुंतवणूकदार आणि ग्राहकांना आश्चर्याचा धक्का दिला एवढे मात्र खरे! सुरक्षित गुंतवणूक मानल्या जाणाऱ्या सोने-चांदीच्या दरात विक्रमी उच्चांकावरून मोठी घसरण झाल्याने मौल्यवान धातूंमधील तेजीचा जोर ओसरला आहे. सोन्याचे दर उच्चांकावरून सुमारे २५ टक्क्यांनी तर चांदीच्या दरात जवळपास ६० टक्क्यांची मोठी घट झाली आहे. यामुळे जागतिक अस्थिरता आणि भू-राजकीय तणावाच्या काळात सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोने-चांदीत गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांची चिंता वाढली आहे. भविष्यात गुंतवणूक करायची की थांबायचे हा त्यांच्यासमोर प्रश्न आहे. चांदीचा वापर इलेक्ट्रॉनिक्स, सोलर आणि मॅन्युफॅक्चरिंगमध्ये मोठ्या प्रमाणावर होत असल्याने चांदीच्या दरात सोन्यापेक्षा खूप अधिक चढ-उतार होत आहेत. चांदी ही जोखीम घेण्याची क्षमता असलेल्या गुंतवणूकदारांसाठी अधिक योग्य आहे.

महात्मा फुले महामंडळाच्या कर्ज योजनांच्या लाभार्थ्यांचे सर्वेक्षण होणार

योजनांच्या परिणामांचे मूल्यांकन होणार, व्यवसाय, रोजगार व उत्पन्नवाढीची माहिती संकलित करणार

दे. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कर्ज योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांचे सर्वेक्षण आणि योजनांच्या परिणामांचे मूल्यांकन करण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये पायलट प्रकल्प राबविण्यात येणार असून लाभार्थ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा आढावा घेतला जाणार आहे.

मागासवर्गीय समाजातील घटकांचे सामाजिक व आर्थिक उत्थान करणे, त्यांना स्वयंरोजगार व व्यवसायासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे आणि त्यांचे जीवनमान उंचावणे हा महामंडळाचा प्रमुख उद्देश आहे. या उद्देशाने महामंडळामार्फत विविध कर्ज व आर्थिक सहाय्य योजना राबविण्यात येतात.

या सर्वेक्षणासाठी मे. प्रायमूव्ह इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कन्सल्टंट्स प्रा. लि. या संस्थेची तांत्रिक सहाय्य संस्था म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सर्वेक्षणादरम्यान कर्ज योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांशी प्रत्यक्ष संपर्क साधून कर्जाचा वापर कोणत्या व्यवसायासाठी करण्यात आला, संबंधित व्यवसायाची सद्यस्थिती काय आहे, रोजगार व उत्पन्नामध्ये किती वाढ झाली, तसेच कर्ज परतफेडीची स्थिती काय आहे, याची माहिती संकलित करण्यात येणार आहे. याशिवाय कर्ज वितरणानंतर व्यवसाय करताना येणाऱ्या अडचणी, व्यवसायाची प्रगती आणि योजनांच्या अंमलबजावणीतील त्रुटींचाही अभ्यास केला जाणार आहे.

या सर्वेक्षणासाठी महामंडळाच्या नियुक्त प्रतिनिधींना लाभार्थ्यांनी आवश्यक माहिती देकन सहकार्य करावे, असे आवाहन महामंडळामार्फत करण्यात आले आहे. सर्वेक्षणातून प्राप्त होणाऱ्या माहितीच्या आधारे महामंडळाच्या योजनांची परिणामकारकता वाढविणे, भविष्यातील योजनांचे अधिक प्रभावी नियोजन करणे आणि लाभार्थ्यांना उत्तम सुविधा उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे.

शेनझेन परिषद : याल्टा २.० ची चाहूल आणि बदलती जागतिक सत्तासमीकरणे

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

१९ नोव्हेंबर २०२६ रोजी चीनमधील शेनझेन येथे अमेरिका, रशिया आणि चीन या जगातील तीन महासत्तांचे प्रमुख पहिल्यांदाच एकाच मंचावर एकत्र आले. या ऐतिहासिक त्रिपक्षीय बैठकीत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग सहभागी झाले होते. जगातील या तीन महासत्तांचे प्रमुख पहिल्यांदाच एकाच व्यासपीठावर आल्यामुळे, आंतरराष्ट्रीय विश्लेषक या बैठकीची तुलना ८१ वर्षांपूर्वीच्या १९४५ च्या याल्टा परिषदेशी करत आहेत. फेब्रुवारी १९४५ मध्ये दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटच्या टप्प्यात तत्कालीन तीन महासत्तांचे प्रमुख–अमेरिकेचे फ्रँकलिन डी. रुझवेल्ट, ब्रिटनचे विन्स्टन चर्चिल आणि सोव्हिएत युनियनचे जोसेफ स्टॅलिन–क्रिमियामधील याल्टा शहरात एकत्र आले होते. याल्टा परिषदेत या तीन मोठ्या नेत्यांनी इतर लहान देशांच्या सहभागाशिवाय महायुद्धा नंतरच्या जगाची रचना आणि आपापली प्रभाव क्षेत्रे निश्चित केली होती. तसेच यातूनच पुढे संयुक्त राष्ट्रसंघाची पायाभरणी झाली.

शेन्झेन येथील बैठकीतही युक्रेन किंवा युरोपीय देशांच्या प्रतिनिधींशिवाय तीन बड्या महासत्ता एकत्र आल्याने, अनेक तज्ज्ञांनी याला 'याल्टा २.०' असे संबोधले आहे. बलाढ्य देश एकत्र येऊन जागतिक सत्तासंतुलन आणि इतर देशांचे भवितव्य ठरवत असल्याची भावना या तुलनेमागे आहे.

युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की आणि अनेक आंतरराष्ट्रीय विश्लेषकांनी शेनझेन येथील या बैठकीचे वर्णन 'याल्टा २.०' असे केले आहे. लहान देशांना विश्वासात न घेता जगातील तीन बड्या महासत्ता एकत्र येऊन आपले प्रभावक्षेत्र वाटून घेत असल्याची भीती अनेक देशांनी व्यक्त केली आहे. या तुलनेवर भाष्य करताना व्लादिमीर पुतिन यांनी याल्टा परिषदेचे समर्थन केले आणि "याल्टा येथे कोणीही जगाची वाटणी केली नव्हती, तर केवळ जमिनीवरील वास्तविकता स्वीकारली होती," असे विधान केले.

आशिया–पॅसिफिक आर्थिक सहकार्य

शिखर परिषद २०२६ च्या निमित्ताने ही बैठक पार पडली. दुसऱ्या महायुद्धानंतर पहिल्यांदाच या तिन्ही देशांचे सर्वोच्च नेते अशाप्रकारे एकत्र आल्याने या भेटीला जागतिक राजकारणात मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे.ट्रम्प यांनी या भेटीचे वर्णन "आम्ही इतिहास घडवत आहोत" असे केले, तर जिनपिंग यांनी या बैठकीला "नवीन सुरुवात" म्हटले.

या ऐतिहासिक बैठकीत शांततेचा संयुक्त जाहीरनामा जाहीर करण्यात आला. सुमारे ८० ते ९० मिनिटे चाललेल्या बंद दाराआड चर्चेनंतर तिन्ही नेत्यांनी शांततेबाबत एक चार कलमी संयुक्त निवेदन जारी केले. यामध्ये जागतिक धोरणात्मक स्थिरता आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षा राखण्याची वचनबद्धता व्यक्त करण्यात आली आहे.

या बैठकीत अण्वस्त्र धोका टाळण्यावर भर दिला. "अणुयुद्ध कधीही जिंकले जाऊ शकत नाही आणि ते कधीही लढले जाऊ नये," यावर तिन्ही नेत्यांनी एकमत दर्शवले. अण्वस्त्रांचा प्रसार रोखणे आणि त्यांचा धोका कमी करण्यासाठी संवाद सुरू ठेवण्याचे या बैठकीत ठरले. या बैठकीत रशिया-युक्रेन युद्ध आणि इराणमधील संघर्षावरही चर्चा झाली. मात्र, या मुद्द्यांवर कोणताही ठोस करार किंवा मोठा तोडगा निघू शकला नाही, असे द गार्डियन आणि न्यूयॉर्क टाइम्स च्या वृत्तात म्हटले आहे.

तिन्ही देशांमध्ये स्थिर ऊर्जा प्रवाह कायम ठेवण्याबाबत आणि पेट्रोलियम उत्पादनांच्या वाढीबाबत या संयुक्त निवेदनात सहमती दर्शवण्यात आली आहे.

शेनझेन येथे अमेरिका, रशिया आणि चीन या तीन महासत्तांच्या प्रमुखांची झालेली त्रिपक्षीय बैठक ही बदलत्या जागतिक राजकारणातील एक महत्त्वपूर्ण घडामोड मानली जाऊ शकते. या बैठकीतून जागतिक सत्तासमतोल, आर्थिक हितसंबंध, सामरिक स्पर्धा आणि आंतरराष्ट्रीय संबंधांची नवी दिशा निश्चित होण्याची शक्यता आहे. मात्र, तीन महासत्तांमधील जवळीक किंवा संवाद म्हणजे जागतिक शांततेची हमी असेलच असे नाही. भारतासाठी ही परिस्थिती विशेषतः महत्त्वाची आहे. अमेरिका, रशिया आणि चीन या तिन्ही देशांशी भारताचे स्वतंत्र राजनैतिक, आर्थिक आणि सामरिक संबंध आहेत. त्यामुळे भारताने कोणत्याही एका महासत्तेच्या प्रभावाखाली न जाता आपल्या राष्ट्रीय हितांना सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक आहे.

बदलत्या जागतिक समीकरणांमध्ये भारताने सामरिक स्वायत्तता, आर्थिक स्वावलंबन आणि मुत्सद्देगिरीचा समतोल राखला, तरच उदयास येणाऱ्या नव्या जागतिक व्यवस्थेत भारत स्वतःचे प्रभावी स्थान अधिक बळकट करू शकेल.

– ९५६२५१४३०६

वेलिंग्टन कसोटीत भारताची दमदार मुसंडी; न्यूझीलंडची गोलंदाजी निष्प्रभ, राहुलचे ऐतिहासिक शतक!

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

राहुलची सात तासांची झुंजार खेळी, गिलचे दुर्दैवी अपयश, पडिक्कलची संयमी साथ आणि पंतचा आक्रमक बाणा; चौथ्या दिवशी भारताची आघाडी आणखी वाढणार?

वेलिंग्टनच्या ऐतिहासिक बॅसिन रिझर्व्ह मैदानावर भारत आणि न्यूझीलंड यांच्यात सुरू असलेल्या पहिल्या कसोटी सामन्याने तिसऱ्या दिवसाअखेर अत्यंत रंजक वळण घेतले आहे. पहिल्या दोन दिवसांत वेगवान गोलंदाजांना अनुकूल असलेल्या खेळपट्टीवर भारतीय गोलंदाजांनी सुरुवातीला वर्चस्व गाजवले; मात्र न्यूझीलंडच्या हेन्री निकोल्स आणि ग्लेन फिलिप्स यांनी केलेल्या अभेद्य प्रतिकारामुळे यजमानांना सन्मानजनक धावसंख्या उभारता आली. त्यानंतर भारतीय फलंदाजांनी मात्र आपल्या दजेदार फलंदाजीच्या जोरावर सामन्याचे पारडे पूर्णपणे भारताच्या बाजूने झुकवले आहे. तिसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारताने पहिल्या डावात १२५ षटकांत ४ बाद ४८६ धावा उभारत ११८ धावांची आघाडी मिळवली होती.

या सामन्यातील आतापर्यंतचा प्रवास पाहता भारतीय संघाने गोलंदाजीतील सुरुवातीचे वर्चस्व फलंदाजांच्या भक्कम कामगिरीने अधिक मजबूत केले आहे. आता चौथ्या दिवशी भारत किती मोठी आघाडी घेते आणि न्यूझीलंडच्या दुसऱ्या डावाला किती लवकर खिंडार पाडतो, याकडे क्रिकेटविश्वाचे लक्ष लागले आहे.

भारतीय गोलंदाजांचा सुरुवातीला धडाका; न्यूझीलंडची अवस्था ७० धावांत ५ बाद !

नाणेफेक आणि खेळपट्टीचा स्वभाव यांचा विचार करता न्यूझीलंडला पहिल्या डावात मोठी धावसंख्या उभारण्याची संधी होती. परंतु भारतीय वेगवान गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच अचूक टप्पा, स्विंग आणि उसळीचा प्रभावी वापर करत यजमान फलंदाजीला हादरे दिले. जसप्रीत बुमराहने आपल्या अनुभवाचा प्रत्यय देत न्यूझीलंडच्या आघाडीच्या फलंदाजांना लक्ष्य केले. आकाशदीपनेही त्याला उत्तम साथ दिली. न्यूझीलंडची अवस्था अवघ्या ७० धावांत ५ बाद अशी झाली होती. अशा परिस्थितीत कायम राखण्याच्या प्रयत्नात तो बाद झाला.

त्यानंतर राहुलला साथ देण्यासाठी आलेल्या देवदत्त पडिक्कलने आपल्या कसोटी फलंदाजीतील परिपक्वता दाखवून दिली. राहुल आणि पडिक्कल यांनी न्यूझीलंडच्या गोलंदाजांना विकेटसाठी दीर्घकाळ प्रतीक्षा करायला लावली. दोघांमध्ये दुसऱ्या विकेटसाठी १६५ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी झाली.पडिक्कलने १७५ चेंडूत ८० धावा केल्या. त्याने आक्रमकतेपेक्षा खेळपट्टीवर स्थिरावण्याला प्राधान्य दिले. राहुलला उत्तम साथ देत भारतीय डावाचा पाया अधिक मजबूत केला. काइल जेमिसनने पडिक्कलला बाद करून ही भागीदारी संपुष्टात आणली; मात्र तोपर्यंत भारताने न्यूझीलंडच्या धावसंख्येकडे वेगाने वाटचाल केली होती.

राहुलचे ऐतिहासिक शतक; सात तासांची फलंदाजी ठरली संस्मरणीय!

या कसोटीच्या तिसऱ्या दिवसाचा खरा नायक ठरला तो के. एल. राहुल! कसोटी क्रिकेटमध्ये तांत्रिक कौशल्य, संयम, एकाग्रता आणि परिस्थितीनुसार फलंदाजी करण्याची क्षमता किती महत्त्वाची असते, याचे उत्तम उदाहरण राहुलने आपल्या खेळीतून सादर केले. तिसऱ्या दिवसाची सुरुवात करताना राहुल ५२ धावांवर नाबाद होता. त्यानंतर त्याने प्रत्येक सत्रात आपली एकाग्रता कायम ठेवत न्यूझीलंडच्या गोलंदाजांचा समर्थपणे सामना केला. चेंडू सोडण्याची योग्य निवड, ऑफ स्टंपबाहेरील चेंडूंना दिलेले प्राधान्य आणि खराब चेंडूंवर केलेले प्रहार यामुळे त्याची खेळी अधिक प्रभावी ठरली. तब्बल २९० चेंडूंचा सामना करत राहुलने १३६ धावा केल्या. त्याच्या या खेळीत ९ चौकार आणि २ षटकारांचा समावेश होता. हे त्याचे कसोटी कारकिर्दीतील १३ वे शतक ठरले. या शतकाचे ऐतिहासिक महत्त्वही विशेष आहे. दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड या चारही देशांमध्ये कसोटी शतक झळकावणारा राहुल हा भारताचा पहिला सलामीवीर ठरला. यापूर्वी भारताच्या मोजक्या दिग्गज फलंदाजांनीच या चारही देशांमध्ये शतक झळकावण्याची कामगिरी केली आहे. विशेष म्हणजे, न्यूझीलंडच्या भूमीवर राहुलचे हे पहिले कसोटी शतक आहे. त्याने केवळ धावा केल्या नाहीत, तर भारतीय डावाला भक्कम आधार देत न्यूझीलंडच्या गोलंदाजांचा आत्मविश्वासही डळमळीत केला. अखेर नॅथन स्मिथच्या गोलंदाजीवर स्वतःच्याच यष्टींवर चेंडू मारून घेत त्याची ही झुंजार खेळी संपुष्टात आली. मात्र, त्याने भारतासाठी विजयाची भक्कम पायाभरणी केली होती.

गिलचे दुर्दैवी अपयश; शतकाने हुलकावणी दिली

भारतीय कर्णधार शुभमन गिलने या डावात अत्यंत आत्मविश्वासपूर्ण फलंदाजी केली. राहुल बाद झाल्यानंतर त्याने डावाची जबाबदारी स्वीकारली आणि न्यूझीलंडच्या गोलंदाजांवर प्रतिहल्ला चढवला. गिलच्या फलंदाजीतील फटकेबाजी, विशेषतः पुल आणि फ्लिकचे फटके, प्रेक्षणीय होते. त्याने १४६ चेंडूंचा सामना करत ९८ धावा केल्या. त्यात ९ चौकार आणि २ षटकारांचा समावेश होता. शतकापासून केवळ दोन धावा दूर असताना जेकब डफीच्या चेंडूवर त्याची ऑफ स्टंप उडाली. कर्णधार म्हणून संघाला आघाडी मिळवून देण्याच्या दृष्टीने गिलची ही खेळी अत्यंत महत्त्वाची होती. मात्र, ९८ धावांवर बाद होण्याची खंत त्याला निश्चितच राहील. शतकाच्या उंबरठ्यावर बाद झाल्यामुळे भारतीय चाहत्यांचीही निराशा झाली. विशेष म्हणजे, गिलने यापूर्वीही न्यूझीलंडविरुद्ध आपल्या फलंदाजीची गुणवत्ता दाखवून दिली आहे. या वेळी शतकाने त्याला अगदी जवळ येऊनही हुलकावणी दिली.

दुखापतीनंतर पुनरागमन; पंतने दाखवला आक्रमक बाणा

दुखापतीतून सावरून पुनरागमन करणाऱ्या ऋषभ पंतकडून भारतीय संघाला मोठ्या अपेक्षा होत्या. त्याने त्या अपेक्षांना साजेसा खेळ केला. सुरुवातीला संयम दाखवणाऱ्या पंतने एकदा खेळपट्टीवर स्थिरावल्यानंतर न्यूझीलंडच्या गोलंदाजांवर हल्ला चढवला. विशेषतः जेकब डफीच्या गोलंदाजीवर सलग षटकार आणि चौकार ठोकत त्याने भारताची आघाडी शंभर धावांच्या पुढे नेली. त्याने अवघ्या ६२ चेंडूत नाबाद ५५ धावा केल्या. त्याच्या खेळीत ५ चौकार आणि २ षटकारांचा समावेश होता. पंतच्या या खेळीचे महत्त्व केवळ धावसंख्येपुरते मर्यादित नाही. दुखापतीनंतर पुनरागमन करताना त्याने दाखवलेला आत्मविश्वास आणि आक्रमक वृत्ती भारतीय संघासाठी निश्चितच सकारात्मक बाब आहे. दिवसाचा खेळ संपताना अंशुल कंबोज नाईटवॉचमन म्हणून त्याच्यासोबत खेळपट्टीवर होता.

न्यूझीलंडची गोलंदाजी अपयशी; डफीवर धावांचा भडिमार!

न्यूझीलंडच्या गोलंदाजांसाठी तिसरा दिवस निराशाजनक ठरला. भारतीय फलंदाजांनी त्यांना कोणतीही सहज संधी दिली नाही. जेकब डफी, नॅथन स्मिथ आणि काइल जेमिसन यांना विकेट मिळवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावे लागले. डफीने धावा रोखण्यात अपयश पत्करले. त्याने ३६ षटकांत १८१ धावा दिल्या. जेमिसनने २७ षटकांत ५७ धावा देत १ बळी मिळवला, तर स्मिथने १ बळी घेतला. न्यूझीलंडने नव्या चेंडूचा वापर करून भारतीय फलंदाजांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला. क्षेत्ररक्षणात बदल, गोलंदाजीचे वेगवेगळे पर्याय आणि आखूड टप्पाचे चेंडू अशा सर्व उपाययोजना करूनही भारतीय फलंदाजांनी परिस्थितीवर नियंत्रण मिळवले.

चौथ्या दिवसाचे गणित : भारत किती मोठी आघाडी वाढविणार ?

तिसऱ्या दिवसाचा खेळ संपताना भारताने ४ बाद ४८६ धावा केल्या असून न्यूझीलंडच्या पहिल्या डावापेक्षा ११८ धावांची आघाडी मिळवली आहे. हातात अद्याप सहा विकेट शिल्लक असल्याने भारताला मोठी धावसंख्या उभारण्याची संधी आहे. चौथ्या दिवशी भारतीय संघ व्यवस्थापनासमोर दोन महत्त्वाचे पर्याय असतील. पहिला म्हणजे फलंदाजी सुरू ठेवून आघाडी २०० ते २५० धावांपर्यंत नेणे आणि दुसरा म्हणजे परिस्थितीचा अंदाज घेत योग्य वेळी डाव घोषित करून न्यूझीलंडला फलंदाजीसाठी आमंत्रित करणे. कसोटी क्रिकेटमध्ये डाव घोषित करण्याची वेळ ही केवळ धावसंख्येवर अवलंबून नसते. उर्वरित षटके, खेळपट्टीचा स्वभाव, हवामान आणि गोलंदाजांना मिळणारी मदत या सर्व बाबींचा विचार करावा लागतो. भारताने अनावश्यक वेळ खर्च न करता योग्य वेळी निर्णय घेतला, तर न्यूझीलंडवर विजयासाठी दबाव निर्माण करता येईल.

भारतीय गोलंदाजांसमोर खरे आव्हान

न्यूझीलंडच्या दुसऱ्या डावात भारतीय गोलंदाजांना पहिल्या डावातील अनुभवाचा फायदा घेता येऊ शकतो. पहिल्या डावात निकोल्स आणि फिलिप्स यांनी केलेली २१६ धावांची भागीदारी भारतीय संघ विसरू शकत नाही. त्यामुळे दुसऱ्या डावात सुरुवातीच्या विकेट्स मिळवणे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. बुमराहची अचूकता, आकाशदीपचा टप्पा आणि अन्य वेगवान गोलंदाजांची साथ यावर भारताचे गोलंदाजीतील यश अवलंबून असेल. निकोल्स आणि फिलिप्स यांना पुन्हा एकदा मोठी भागीदारी करण्याची संधी मिळाली, तर भारताचे विजयाचे गणित गुंतागुंतीचे होऊ शकते. त्यामुळे क्षेत्ररक्षणातही भारतीय संघाला अधिक सतर्क राहावे लागेल. दुसरीकडे, न्यूझीलंडसाठी चौथा दिवस हा पुनरागमनाचा प्रयत्न करण्याची शेवटची मोठी संधी असेल. पहिल्या डावात त्यांनी संकटातून बाहेर पडत ३६८ धावा केल्या असल्या, तरी दुसऱ्या डावात भारतीय गोलंदाजांच्या आक्रमणाला सामोरे जाणे सोपे नसेल.

विजयाची संधी भारतासमोर; मात्र सावधगिरी आवश्यक

वेलिंग्टन कसोटीच्या पहिल्या तीन दिवसांचा विचार करता भारताने सामन्यात चांगले वर्चस्व मिळवले आहे. सुरुवातीला गोलंदाजांनी केलेली कामगिरी, न्यूझीलंडच्या मोठ्या भागीदारीला रोखण्यात आलेले अपयश आणि त्यानंतर फलंदाजांनी केलेली भरपाई या सर्व बाबींचा एकत्रित विचार करणे आवश्यक आहे. राहुलचे शतक भारतीय डावाचा कणा ठरले, तर जैस्वाल, पडिक्कल आणि गिल यांनी धावसंख्येला गती दिली. पंतने नाबाद अर्धशतक झळकावत भारताची स्थिती आणखी मजबूत केली. मात्र, कसोटी क्रिकेटमध्ये तीन दिवसांचे वर्चस्व म्हणजे विजयाची हमी नसते. न्यूझीलंडला घरच्या मैदानाचा अनुभव आहे. निकोल्स आणि फिलिप्ससारखे फलंदाज पुन्हा एकदा प्रतिकार करू शकतात. त्यामुळे भारतीय संघाने विजयाचा अतिरेकाने विचार न करता प्रत्येक सत्राचे नियोजन करणे अधिक महत्त्वाचे आहे.

– ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com / ई-पेपर : epaper.sinhvani.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

चित्रपट हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम : संदीपकुमार साळुंके

'जयंती-२' ने मराठी फिल्म फेस्टिवलला उत्साहात प्रारंभ





दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

चित्रपट हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून समाजाच्या मानसिकतेला योग्य दिशा देणारे आणि परिवर्तन घडवून आणणारे प्रभावी माध्यम आहे, असे प्रतिपादन प्राप्तिकर आयुक्त संदीपकुमार साळुंके यांनी केले. ऑरेंज सिटी कल्चरल फाउंडेशनच्या वतीने व्हीआयपी रोडवरील वनामती सभागृहात आयोजित दोन दिवसीय मराठी फिल्म फेस्टिवलचा प्रारंभ शनिवारी उत्साहात झाला. त्यावेळी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. एनएफडीसी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर महानगरपालिका, सप्तक आणि सिने मोंटाज यांच्या सहकार्याने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी मोनाली साळुंखे, चित्रपट निर्माते व दिग्दर्शक विनोद कांबळे, मगेश बदर, राज मोरे, विजय कळमकर आणि स्नेहल ठक्कर यांच्यासह ऑरेंज सिटी कल्चरल फाउंडेशनचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम, सप्तकचे विलास मानेकर यांची मंचावर उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून महोत्सवाला प्रारंभ झाला.

साळुंके म्हणाले, चित्रपट ही कथाकथनाची प्रभावी कला असून, त्यात माणसांचे आयुष्य बदलण्याची ताकद आहे. समाजाला ज्या विषयांबाबत जागरूक करण्याची गरज असते, त्या विषयांवर संवेदनशील निर्माते आणि दिग्दर्शक चित्रपट तयार करतात. समाजाच्या मानसिकतेला योग्य दिशा देण्यासाठी चांगले लेखक, दिग्दर्शक आणि कलाकार यांची आवश्यकता आहे, असेही त्यांनी नमूद केले.

प्रास्ताविकातून डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांनी फाउंडेशनच्या कार्याचा आढावा घेतला. नव्या पिढीतील चित्रपट निर्माते आणि कलाकारांना प्रोत्साहन मिळावे, हा महोत्सव आयोजनामागील प्रमुख उद्देश असल्याचे सांगत त्यांनी येत्या २० व २१ फेब्रुवारी २०२७ रोजी आरोग्य फिल्म फेस्टिवल आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुधीर भावे यांनी केले, तर डॉ. उदय गुप्ते यांनी आभार मानले.

आज महोत्सवात.....

रविवारी, २२ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजल्यापासून साबर बोंडं, सिनेमॅन आणि कुर्ला टू वेंगुर्ला हे चित्रपट प्रदर्शित करण्यात येणार आहेत. यावेळी चित्रपटांचे निर्माते व दिग्दर्शक प्रेक्षकांना थेट संवाद साधण्याची संधी मिळणार आहे.

महोत्सवाला उत्तम प्रतिसाद

महोत्सवाच्या पहिल्या दिवशी उद्घाटन सत्रानंतर लेखन आणि दिग्दर्शन शैलेश नरवाडे लिखित व दिग्दर्शित 'जयंती २' प्रदर्शित करण्यात आला. हा विदर्भातील चंद्रपूर येथील आदिवासी विद्यार्थिनींच्या जीवनावर आधारित असून जात, आरक्षण, समता, उच्च शिक्षणसंस्थांतील भेदभाव आणि शैक्षणिक राजकारण यांवर चित्रपट भाष्य करणारा चित्रपट होता. त्यानंतर मंगेश बदर दिग्दर्शित 'मदार' आणि राज मोरे दिग्दर्शित 'खालिद के शिवाजी' हे चित्रपट प्रदर्शित करण्यात आले. मंगेश बदर व राज मोरे यांनी यावेळी प्रेक्षकांची संवाद साधताना चित्रपट निर्मिती मागची भूमिका विशद केली. या महोत्सवाला रसिकांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे.

थोडक्यात

स्नेहल भांदककर-राखुंडे यांना आचार्य पदवी प्रदान

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

डॉ.एस.सी. गुल्हाने प्रेरणा कॉलेजमधील मानव्यशास्त्र विभागाच्या प्रमुख आणि सहाय्यक प्राध्यापक स्नेहल आर. भांदककर (राखुंडे) यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारे इंग्रजी विषयात आचार्य पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांनी 'अ क्रिटिकल ॲनालिसिस अ, फडेरेक आल्टन वॉलकॉट् सिलेक्ट प्ले' या विषयावर संशोधन केले असून, हे संशोधन कामठी येथील सेठ केसरिमल पोरवाल कॉलेजच्या इंग्रजी विभागातील प्राध्यापक डॉ. गिझाला आर. हाश्मी यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे. त्यांच्या या संशोधनात साहित्यातील नोबेल पारितोषिक विजेते (१९९२) डेरेक वॉलकॉट यांच्या नाटकांच्या माध्यमातून वसाहतवाद, वसाहतवादोत्तर ओळख्ख आणि सांस्कृतिक स्मृती यांचे विश्लेषण करण्यात आले आहे. अध्यापनाचा एक दशकाहून अधिक अनुभव असलेल्या स्नेहल भांदककर राखुंडे यांनी शैक्षणिक आणि संशोधनात्मक क्षेत्रातही महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.



त्यांनी डॉ.एस.सी. गुल्हाने, डॉ.प्रवीण जोशी, डॉ.उर्मिला डबीर, आपल्या संशोधन मार्गदर्शिका, पती प्रशांत राखंडे, भाऊ सी.ए.शैलेश भांदककर आणि सहकाऱ्यांचा प्रोत्साहन व समर्थनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. त्यांच्या या यशाबद्दल कॉलेज व्यवस्थापन, प्राचार्य, प्राध्यापकवृंद आणि कर्मचारी वर्गाकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

हातोडी पुलिया येथे भगवान बिरसा मुंडा जयंती उत्साहात साजरी

पारंपरिक वेशभूषा, ढोल-ताशांचा गजर आणि युवकांचा उत्स्फूर्त सहभाग



दै. सिंहवाणी वृत्त, काचुरवाही

रामटेक तालुक्यातील हातोडी पुलिया येथे भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी पारंपरिक वेशभूषा, पिवळे ध्वज, डीजेचा गजर आणि सेवा जोहारच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. सकाळी ८.३० वाजता हातोडी पुलिया येथून आदिवासी समाजबांधवांच्या वतीने हिरवा व पिवळा ध्वज दाखवून भव्य रॅलीला सुरुवात करण्यात आली. हातोडी मार्गे लोहडोंगरी व कॅम्प परिसरातून काढण्यात आलेल्या या रॅलीत युवकांसह समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

सायंकाळी ६ वाजता माजी पंचायत समिती सभापती प्रा. किरण धुर्वे यांच्या हस्ते भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन व कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते निखिल नरेश धोपटे होते. यावेळी संजीवनी पत संस्था अध्यक्ष तथा माजी जि.प सदस्य देवराव धुर्वे, राहुल किरपान, ग्रामपंचायत सदस्य रजाताई मडावी, नंदकिशोर कोहळे, खुशालजी घरजाडे, माजी सरपंच बळीरामजी खंडाते, बिरसा ब्रिगेडचे अध्यक्ष कन्हैयाजी पंधराम, नितीनजी करारे, परतेती आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांसाठी अल्पोपाहार व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. युवकांचा उत्स्फूर्त सहभाग आणि पारंपरिक आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडवत भगवान बिरसा मुंडा यांच्या संघर्षमय जीवनकार्याला व आदिवासी समाजाच्या स्वाभिमानाच्या विचारांना अभिवादन करून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

प्रविण तोगडिया यांचे बेसा पिपळा येथे स्वागत



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

आंतरराष्ट्रीय हिंदु परिषद व राष्ट्रीय बजरंगदलाचे अध्यक्ष हिंदुहृदय सम्राट प्रविण तोगडिया यांचे बेसा पिपळा परिसरात आगमन झाले. विविध ठिकाणी भेट दिल्यानंतर बेसा पिपळा रोडवरील कमल सेलीब्रेशन येथे प्रविण तोगडिया यांचे आगमन झाले. याप्रसंगी कमल फाउंडेशनचे अध्यक्ष सतिश दाभाडे यांनी त्यांचे स्वागत केले तसेच या प्रसंगी नरेश भोयर उपनगराध्यक्ष बेसा पिपळा नगरपंचायत व अध्यक्ष देशगौरव प्रतिष्ठान यांनी तोगडिया यांचे स्वागत केले. तोगडीया यांनी हिंदु संस्कृतीच्या प्रसार प्रचारावर व जनतेच्या मदतीसाठी सुरू केलेल्या हिंदू हेल्पलाईनची माहिती दिली. यावेळेस अमोल धनुष्कर पंत उपाध्यक्ष देशगौरव प्रतिष्ठान, अविनाश वानखेडे व बरेच कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

नागपुरात बाईक टॅक्सीला अद्याप परवानगी नाही, अनधिकृत चालकांवर होणार कारवाई

बाईक टॅक्सीचा वापर टाळण्याचे प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे आवाहन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

राज्य शासनाने किंवा प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर (शहर) यांनी अद्याप कोणत्याही बाईक टॅक्सी सेवेला परवाना अथवा अधिकृत मान्यता दिलेली नाही. त्यामुळे शहरात अनधिकृतपणे बाईक टॅक्सी व्यवसाय करणाऱ्या चालकांवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रादेशिक परिवहन कार्यालयाने दिला आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्रशासनाकडून सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत असून, त्यांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असेही कार्यालयाने स्पष्ट केले आहे. नागपूर शहरातील सर्व प्रवासी आणि नागरिकांनी अनधिकृतपणे सुरू असलेल्या बाईक टॅक्सी सेवेचा वापर करू नये. प्रवासासाठी शासनमान्य व अधिकृत वाहतूक सुविधांचाच वापर करावा, असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर (शहर) यांच्या वतीने करण्यात आले आहे.

प्रारुप मतदार यादीत नाव नसलेल्या मतदारांना नाव समाविष्ट करण्यासाठी पुन्हा संधी

३० नोव्हेंबरपर्यंत करता येणार नाव समाविष्ट, गणना प्रपत्र सादर न झालेल्या १४ लाख ४३ हजार मतदारांची नोंद

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम अंतर्गत अनुपस्थित, स्थलांतरित, मृत किंवा दुबार म्हणून नोंद झाल्यामुळे प्रारूप यादीत नाव समाविष्ट न होऊ शकलेल्या मतदारांना अंतिम मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याची संधी भारत निवडणूक आयोगाने पुन्हा उपलब्ध करून दिली आहे. यासाठी सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. जिल्ह्यात प्रारूप यादीत समावेश न झालेल्या १४ लाख ४३ हजार ५११ मतदारांची नोंद झाली आहे.

यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी संबंधित मतदारांना त्यांचा पूर्वीचा एढ्ढछ क्रमांक वापरून भारत निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर किंवा एउक्तएळ अस्त्रस्त्र द्वारे गणना प्रपत्र डाउनलोड करून सादर करता येईल. पूर्वीच्या पत्त्यावरच वास्तव्यास असलेल्या मतदारांनी गणना प्रपत्रासोबत परिशिष्ट-इ मधील निवेदन सादर करावे. राज्यांतर्गत स्थलांतरित मतदारांनी नवीन पत्त्याचा तपशील व पुराव्यासह परिशिष्ट-उ मधील निवेदन सादर करावे. अशा मतदारांना Form-8 सादर करण्याची आवश्यकता नाही. संबंधित BLO यांच्यामार्फत मतदारांशी संपर्क साधून गणना प्रपत्र प्रत्यक्ष किंवा WhatsApp, ई-मेल अथवा स्टार द्वारे उपलब्ध करून देण्यात येईल. इछड सोबत संपर्क साधण्यासाठी Book a Call with BLO या सुविधेचा वापर करता येईल. रक्षक प्रक्रियेदरम्यान Form-6 सादर केलेल्या मतदारांना पुन्हा गणना प्रपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही. आयोगाने जाहीर केलेल्या सुधारित SIR वेळापत्रकानुसार १५ डिसेंबर पर्यंत दावे व हरकती स्वीकारून त्याचा निपटारा करण्यात येईल. अंतिम मतदार यादी २२ डिसेंबर रोजी जाहीर करण्यात येईल. अनुपस्थित, स्थलांतरित, मृत किंवा दुबार मतदारांच्या गणना प्रपत्रासंदर्भात १८ नोव्हेंबर पर्यंत गणना प्रपत्र तयार करणे व मुद्रित करणे, १८ ते ३० नोव्हेंबर पर्यंत गणना प्रपत्र वितरण व संकलन, दिनांक १० डिसेंबर पर्यंत गणना प्रपत्रांचा निपटारा केला जाईल. संबंधित मतदारांनी प्रारूप मतदार यादीत आपले नावे तपासून, नाव समाविष्ट न झाल्यास संबंधित BLO, मतदार नोंदणी अधिकारी किंवा सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांच्याशी संपर्क साधून आवश्यक गणना प्रपत्र व निवेदन विहित पद्धतीने सादर करावे. संबंधित मतदारांनी या संधीचा लाभ घेऊन अंतिम मतदार यादीत नाव समाविष्ट करून घेण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी केले आहे.

नांदी संमेलनाचे आज उद्घाटन, डॉ. अभय बंग यांची प्रमुख उपस्थिती

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : १०० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे नियोजित आणि विदर्भ साहित्य संघ, नागपूर आयोजित 'नांदी संमेलन'चे उद्घाटन रविवार, २२ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता 'सर्च' फाउंडेशन, गडचिरोलीचे संस्थापक डॉ. अभय बंग यांच्या हस्ते होणार आहे.

दक्षिण मध्य सांस्कृतिक केंद्र सभागृह, सिव्हिल लाइन्स येथे होणाऱ्या या कार्यक्रमाला मराठी विद्यापीठ, रिद्धपूरचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर प्रमुख अतिथी राहणार असून दक्षिण मध्य सांस्कृतिक केंद्राच्या संचालक आस्था कर्लेकर अध्यक्षस्थानी राहतील. सत्रांमध्ये 'संघभूमी आणि दीक्षाभूमी' या विषयावर ज्येष्ठ साहित्यिक डॉ. वि. स. जोग यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद होणार असून त्यानंतर जागतिक कीर्तीचे मानसोपचारतज्ज्ञ पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांची प्रकट मुलाखत आयोजित करण्यात आली आहे. संमेलनाच्या समारोपीय कार्यक्रमाला विदर्भ साहित्य संघाचे माजी अध्यक्ष प्रदीप दाते प्रमुख, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण व विदर्भ साहित्य संघाचे विद्यमान अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांची उपस्थिती राहील. या संमेलनाला साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विदर्भ साहित्य संघातर्फे करण्यात आले आहे.

जिल्हा वकील संघटनेच्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा २०२६ चा उत्साहात शुभारंभ

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

जिल्हा वकील संघटना, नागपूरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा २०२६ चा उद्घाटन सोहळा शनिवारी २१ नोव्हेंबर रोजी रुबी क्लब, सेमिनरी हिल्स, नागपूर येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या उद्घाटन सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे माननीय न्यायमूर्ती नंदेश एस.देशपांडे उपस्थित होते, तर प्रमुख अतिथी म्हणून माननीय प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश सलमान एम.एस. आजमी यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी न्यायमूर्ती नंदेश देशपांडे यांचे स्वागत ॲड. विकास कऱ्हाडे यांनी केले.



माननीय प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश सलमान आजमी यांचे स्वागत ॲड. वैशाली बगाडे यांनी केले. तसेच ॲड. विकास कऱ्हाडे यांचे स्वागत ॲड. धर्मराज बोघाटी आणि धीरेंद्र उपाध्याय यांनी केले. ॲड.वैशाली बगाडे यांचे स्वागत ॲड.स्नेहा पेटकर यांनी केले. ॲड.पंकज राजवाडे यांचे स्वागत ॲड.निशांत सिंघानिया व ॲड.नगमान अली यांनी केले. ॲड.विकास कऱ्हाडे यांनी प्रास्ताविक सांगितले. न्यायमूर्ती नंदेश एस. देशपांडे व माननीय प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश सलमान एम. एस. आजमी यांनी खेळाडूंना मोलाचे मार्गदर्शन केले. ॲड.सौरभ राऊत यांनी संचालन केले तर ॲड.रोहित रामटेके यांनी आभार मानले.

आज या स्पर्धेत एकूण ५ सामने खेळविण्यात आले. या स्पर्धेचा अंतिम सामना २९ नोव्हेंबर २०२६ रोजी होणार आहे. यावेळी जिल्हा वकील संघटनेचे उपाध्यक्ष ॲड. विकास कऱ्हाडे, उपाध्यक्षा ॲड.वैशाली बगाडे, सहसचिव ॲड.पंकज राजवाडे, ग्रंथालय प्रमुख ॲड.सौरभ राऊत तसेच कार्यकारिणी सदस्य ॲड. रोहित रामटेके, ॲड.सुशांत पाटील, ॲड. मंगेश लढे, ॲड. नवज्योत सोनी आणि ॲड. स्नेहा पेटकर उपस्थित होते.

या क्रिकेट स्पर्धेच्या माध्यमातून अधिवक्त्यांना न्यायालयीन कामकाजाच्या व्यस्त दिनक्रमातून विरंगुळा मिळण्यासोबतच क्रीडाभावना, साघिक एकता, बंधुभाव आणि परस्पर स्नेह वृद्धिंगत होण्यास मदत होणार आहे. कार्यक्रमाला अधिवक्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. जिल्हा वकील संघटनेच्या कार्यकारिणीच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेमुळे अधिवक्ता वर्गात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

एनएसयुआय की कुलगुरु के प्रति सहानुभूति, विश्वविद्यालय के अधिकारी नहीं मान रहे उनकी बात

प्रेस कॉन्फ्रेंस कर कुलगुरु के लिए न्याय और समितियों की रिपोर्ट सार्वजनिक कर दोषियों पर कार्यवाही करने की मांग

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय की प्रशासनिक इमारत जमनालाल बजाज भवन में एनएसयुआई पदाधिकारियों एवं विद्यार्थियों ने प्रेस कॉन्फ्रेंस आयोजित कर कुलगुरु के प्रति सहानुभूति व्यक्त की, एनएसयुआई की राष्ट्रीय सचिव वैष्णवी भारद्वाज ने खेद जताते हुए कहा कि कुलगुरु द्वारा गठित चार प्रमुख समितियों में से अब तक किसी की भी जांच रिपोर्ट सामने नहीं आई है. इससे स्पष्ट होता है कि विश्वविद्यालय के अधिकारी कुलगुरु के निर्देशों और सौंपी गई जिम्मेदारियों को गंभीरता से नहीं ले रहे हैं.



एनएसयुआई की मांग पर गठित प्रमुख समितियां हैं -

१. COEMPT EDU TECH PRIVATE LTD. जांच समिति - परीक्षा कार्यों एवं अनियमितताओं की जांच रिपोर्ट सार्वजनिक की जाए.

२. हाउसकीपिंग कर्मचारी समिति की आधी अधूरी जांच में समिति ने सफाई कर्मचारियों के वेतन से प्रतिमाह ८००० की वसूली संबंधी शिकायत को आंशिक रूप से सत्य माना है. समिति ने कर्मचारियों एवं निरीक्षक के बीच आर्थिक लेन-देन होने की पुष्टि की, समिति ने अनुबंध की शर्तों के आधार पर दोनों सफाई ठेकेदार कंपनियों के अनुबंध रद्द करने की सिफारिश की है लेकिन भ्रष्टाचार कंपनी के ऊपर वित्तीय लेन-देन को लेकर कोई कार्यवाही नही , जांच समिति ने दोषी कंपनियों को मदद कर एकतरह से आराम से जाने की अनुमति दिया है और इस तरह से दोषियों के मनोबल और बढ़ेगा.

३. बिना निविदा एवं अतिरिक्त कार्यों की जांच समिति - करोड़ों रुपये के कार्यों में कथित अनियमितताओं एवं वित्तीय गड़बड़ियों की निष्पक्ष जांच कर कार्रवाई के लिए समिति तो गठित किया गया लेकिन जांच अभिनेताक शुरू नही हुई.

४. दुष्काळग्रस्त विद्यार्थी सहायता टास्क फोर्स प्रभावित विद्यार्थियों को परीक्षा शुल्क में राहत सहित आवश्यक आर्थिक सहायता एवं सुविधाएं प्रदान करने के उद्देश्य से बनाया गया लेकिन कार्य कुछ भी नही.

एनएसयुआई ने कहा कि जांच समितियों का गठन केवल औपचारिकता नहीं होना चाहिए. उनकी समयबद्ध समीक्षा, जांच रिपोर्ट और दोषियों पर कार्रवाई सुनिश्चित करना विश्वविद्यालय प्रशासन की जिम्मेदारी है.

वार्ता के दौरान ज्ञापन सौपकर एनएसयुआई ने मांग की कि कुलगुरु के निर्देशो का पालन सुनिश्चित किया जाए, सभी समितियों की रिपोर्ट सार्वजनिक की जाए और विद्यार्थियों एवं कर्मचारियों से जुड़े मुद्दों पर तत्काल न्यायोचित निर्णय लिए जाएं.

कुलगुरु को संबोधित करते हुए आयोजित प्रेस कॉन्फ्रेंस के दौरान मुख्य रूप से एनएसयुआई के पदाधिकारी और विद्यार्थीयो में अजित सिंह, राष्ट्रीय सचिव वैष्णवी भारद्वाज, आशीष मंडपे, प्रदेश महासचिव प्रणय सिंह ठाकुर, जिला अध्यक्ष साहिल गिरे, नागेश गिन्हे, मुरली शाहू, विद्यासागर त्रिपाठी, लोकेश फुलझले, वैभव मड़ावी, जैनुएल ओवेस, संकेत वांडे, सुहाष चक्रे, यश डोरले, प्रेम बसेवार आदि उपस्थित थे.

थोडक्यात

समाजमाध्यमांचा विवेकाने वापर करणे ही काळाची गरज : डॉ. अजय देशपांडे

'समाजमाध्यमे : जोखीम आणि गरज' या विषयावर परिसंवाद, जिल्हा मराठी महिला साहित्य संमेलनाचा दुसरा दिवस



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

सध्याच्या कालखंडात माध्यमांनी सांगितलेलेच सत्य मानण्याची प्रवृत्ती वाढत असून, त्यातून नव्या डिजिटल गुलामगिरीचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे लोकशाही मूल्ये, नैतिकता आणि विवेकाचे भान ठेवूनच समाजमाध्यमांचा वापर करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन परिसंवादाचे अध्यक्ष डॉ. अजय देशपांडे यांनी केले. मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या अनुदानातून तसेच स्त्री शिक्षण प्रसारक मंडळाद्वारे संचालित महिला महाविद्यालयाच्या वतीने आयोजित नागपूर जिल्हा महिला साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी 'समाजमाध्यमे : जोखीम आणि गरज' या विषयावर परिसंवाद पार पडला. या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अजय देशपांडे होते तर प्रा. डॉ. संदीप तुंडरवार, मोहिनी मोडक, सोनाली नक्षीणे, ज्ञानेश्वर गटकर आणि प्राचार्य डॉ. रिता सोनटक्के यांचा यात सहभाग होता.

प्रा. डॉ. संदीप तुंडरवार यांनी समाजमाध्यमांचा व्यापक प्रभाव आणि त्यातील जोखमींचा ऊहापोह केला. 'पोस्ट-ट्रुथ'च्या काळात सत्यापेक्षा भावना आणि उन्मादाला प्राधान्य मिळत असल्याचे सांगत त्यांनी खोट्या बातम्यांचा वेगाने होणारा प्रसार चिंताजनक असल्याचे नमूद केले. मोहिनी मोडक यांनी समाजमाध्यमे जीवनाचा अविभाज्य भाग बनली असली तरी माहितीचा महापूर, घाईघाईने दिले जाणारे प्रतिसाद, वैयक्तिक माहितीचा गैरवापर, सायबर गुन्हेगारी, 'फिअर ऑफ मिसिंग आऊट' आणि 'लाईक'ची धडपड यांसारख्या धोक्यांकडे लक्ष वेधले. सोनाली नक्षीणे यांनी सोशल मीडियाचा वापर ध्येयाभिमुख आणि चाणाक्षपणे करण्याचा सल्ला दिला. चुकीचा कंटेंट आणि गेम्सचा तरुण व लहान मुलांच्या मानसिकतेवर होणारा परिणाम लक्षात घेता प्रत्यक्ष अनुभव, मैदानी हालचाली आणि उत्तम वाचनाला महत्त्व देण्याचे आवाहन त्यांनी केले. ज्ञानेश्वर गटकर यांनी सोशल मीडिया हे 'अटेन्शन इकॉनॉमी'वर आधारित आभासी जग निर्माण करणारे माध्यम बनल्याचे सांगितले. या परिसंवादाचे सूत्रसंचालन डॉ. संपदा नासेरी यांनी केले, तर डॉ. प्रणया पाटील यांनी आभार मानले.

भगवान बिरसा मुंडा यांची १५१ वी जयंती खैरी बिजेवाडा (वाहिटोला) येथे संपन्न

सुप्रसिद्ध आदिवासी गायिका प्रियांशी भलावी यांचा लाईव्ह कॉन्सेप्ट उत्साहात संपन्न



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

भगवान बिरसा मुंडा १५१ वि जयंती निमित्त ग्राम पंचायत खैरी बिजेवाडा वाहिटोला येथे रिलायन्स पेट्रोल पम्प समोर सुप्रसिद्ध आदिवासी गायिका प्रियांशी भलावी, जबलपूर यांचा लाईव्ह कॉन्सेप्ट प्रोग्राम उत्साहात पार पडला. या कार्यक्रम ला राज्य सभा खासदार, श्रीमती मायाताई इवनाते, उदय सिहं उर्फ गज्जु यादव जिल्हा नियोजन समिती सदस्य नागपूर,बिकेंद्रजी महाजन, अध्यक्ष नगर परिषद रामटेक, हरीश जी उईके, माजी जि. प, सदस्य, सतीश जी डोंगरे, माजी जिल्हा, परिषद सदस्य श्रीमती दुगाताई सर्याम समजकल्याण सभापती,आलोक मानकर उपाध्यक्ष न. प. रामटेक, रणवीर यादव सरपंच ग्रा, पं,खैरी बीजेवाडा, रजत गर्जभिये नगरसेवक, संजय मुलमुले, राहुल जी किरपान, राजकुमार खोब्रागडे अध्यक्ष तालुका दक्षता समिती रामटेक प्रामुख्याने उपस्थित होते.

विनोद मरसकोल्हे, उर्मिला ताई खुडसाव सरपंच ग्रा. पं. खैरी बिजेवाडा, रमेश जी धुर्वे मा. सरपंच,अभिषेक रौतेल उपसरपंच ग्रा. पं. खैरी बिजेवाडा, अजय कठोते सदस्य ग्राम पंचायत, सुलोचना सलामे सदस्य ग्रा. पं., कल्पना मस्के, बिरसा मुंडा सांस्कृतिक महोत्सव समिती वाहिटोला,सदस्य, जगदीश खुडसाव, दुर्गेश मडावी, अनिल कठोते, प्रयास ठवरे, नितीनजी बडिवार माजी ग्रामपंचायत सदस्य , दाऊ कठोते, अरवींद उईके, सुजल परतेती,अंकित धुर्वे,यांनी कार्यक्रम ला सफल करण्यासाठी अथक परिश्रम करण्यात आले. या कार्यक्रमाला गावकरी नागरिक यांचा व इतर गावातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाले.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम आज

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम उद्या, रविवार, दि. २२ नोव्हेंबर २०२६ रोजी महाल येथील गडकरी वाडा येथे आयोजित करण्यात आला आहे.



महालातील गडकरी वाडा येथे मा. मंत्री महोदय यांच्या जनसंपर्क कार्यालयात सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत हा कार्यक्रम होईल. या वेळेत मंत्री महोदय नागरिकांची निवेदने स्वीकारतील. मा. मंत्री महोदय नागरिकांना व्यक्तिशः भेटतील आणि त्यांच्याशी संवाद साधतील. नागरिकांनी आपल्या समस्या, अडचणी, मागण्या लेखी स्वरुपातच (आवश्यक कागदपत्रे जोडून) आणाव्यात. तसेच आपली लेखी निवेदने मा. मंत्री महोदयांना द्यावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. त्यानंतर दुपारी १ ते २ या कालावधीत नितीन गडकरी आपल्या जनसंपर्क कार्यालयात भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना भेटतील.

बोली साहित्याच्या जतनात महिलांचे योगदान मोलाचे

'बोली साहित्यातील लेखिकांचे योगदान' परिसंवादात मान्यवरांचे विचार

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर



बोलीभाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून ती स्त्रियांच्या जगण्याची, संस्कृतीची आणि अस्मितेची ओळख आहे. अंगाई गीते, ओव्या, जात्यावरची गाणी आणि लोकपरंपरेच्या माध्यमातून स्त्रियांनी आपले भावविश्व, संघर्ष आणि सामाजिक वास्तव प्रभावीपणे मांडले आहे. बोली साहित्याच्या जतन आणि संवर्धनामध्ये महिलांचे योगदान अनन्यसाधारण असून त्यांच्या मौखिक आणि लिखित साहित्याने मराठी साहित्यविश्व समृद्ध केले आहे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. काशिनाथ बऱ्हाटे यांनी व्यक्त केले.

मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या अनुदानातून स्त्री शिक्षण प्रसारक मंडळाद्वारे संचालित महिला महाविद्यालय, नागपूर यांच्या वतीने आयोजित नागपूर जिल्हा महिला साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी 'बोली साहित्यातील लेखिकांचे योगदान' या विषयावर दुसरा परिसंवाद पार पडला. परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. काशिनाथ बऱ्हाटे होते. यावेळी प्रा. डॉ. राजकुमार मुसणे, प्रा. डॉ. रावसाहेब काळे आणि शैलजा गावंडे यांनी विचार मांडले.

प्रा. डॉ. राजकुमार मुसणे यांनी सखुबाई गोंधळी, अंजनाबाई खुणे, उषाकिरण आत्राम, प्रीती कापगते यांच्या साहित्याचे दाखले देत स्त्रियांच्या अनुभवविश्वातील संघर्ष, वेदना, शहाणपण आणि जीवनदृष्टी उलगडून सांगितली. नवीन शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर या सांस्कृतिक ठेव्याचे दस्तऐवजीकरण आणि संवर्धन करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

प्रा. डॉ. रावसाहेब काळे यांनी बोलीभाषा आणि प्रमाणभाषेतील फरक स्पष्ट करताना स्त्रियांच्या साहित्याचे वेगळेपण अधोरेखित केले. प्रत्येक पुरुष लेखकाच्या जडणघडणीत, अंगाई गीतांपासून प्रेमकवितेच्या प्रेरणेपर्यंत स्त्रियांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

शैलजा गावंडे यांनी मराठी बोलीभाषेतून लेखन करणाऱ्या स्त्री लेखिका आणि कवयित्रींच्या साहित्यिक व सांस्कृतिक योगदानाचा आढावा घेतला. वैदिक काळातील कवयित्री, गाथा सप्तशती, महदंबा, संत जनाबाई, संत सोयराबाई, बहिणाबाई चौधरी आणि ताराबाई शिंदे यांच्यापासून ते समकालीन ग्रामीण लेखिकांपर्यंतच्या साहित्य प्रवासातून स्त्रियांची प्रतिभा, वेदना, संघर्ष आणि जीवनतत्त्वज्ञान स्पष्ट होते, असे ते म्हणाले. या परिसंवादाचे सूत्रसंचालन डॉ. मंगला गोरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. कांचन गवते यांनी केले.

रामटेक - पवनीच्या जंगलात नर-मादी बिबट मृतावस्थेत! वनविभागात खळबळ



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

रामटेक तालुक्यातील पवनी वनपरिक्षेत्रातील भोंदेवाडा बीटमध्ये एकाच ठिकाणी नर आणि मादी अशा दोन बिबट्यांचे मृतदेह आढळून आल्याने वनविभागात खळबळ उडाली आहे. शनिवारी (दि. २१ नोव्हेंबर) सकाळी सुमारे १० वाजताच्या सुमारास गस्तीवर असलेल्या वनकर्मचाऱ्यांना कक्ष क्रमांक २७१ मध्ये हे दोन्ही बिबट मृतावस्थेत आढळून आले.

स्थानिक बीटरक्षक भोंदेवाडा आणि प्राथमिक प्रतिसाद दलाचे सदस्य शेती व जंगलालगतच्या परिसरात नियमित गस्त घालत असताना ही घटना उघडकीस आली. घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली.

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या नियमानुसार दोन्ही बिबट्यांचे शवविच्छेदन घटनास्थळी करण्यात आले. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. वीरेंद्र सोनकुसरे (देवलापार) यांनी सहायक वनसंरक्षक गोविंद लुचे, मानद वन्यजीव रक्षक अविनाश लोंढे, सातपुडा फाउंडेशनचे मंदार पिंगळे आणि पवनीचे वनपरिक्षेत्र अधिकारी सागर बनसोड यांच्या उपस्थितीत शवविच्छेदन केले. शवविच्छेदनादरम्यान नर बिबट्याचे अंदाजे वय ४ ते ५ वर्षे, तर मादी बिबट्याचे वय ३ ते ४ वर्षे असल्याचे स्पष्ट झाले. विशेष म्हणजे, दोन्ही बिबट्यांचे सर्व दात, नखे आणि मिशा सुस्थितीत असल्याचे आढळून आले. त्यामुळे मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

मृत्यूचे कारण निश्चित करण्यासाठी आवश्यक नमुने नियमानुसार प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. प्रयोगशाळेच्या अहवालानंतरच या दोन्ही बिबट्यांच्या मृत्यूमागील नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास उपवनसंरक्षक डॉ. विनीता व्यास यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक वनसंरक्षक, रामटेक करीत आहेत.

घरच्या स्त्रियांना समानतेचा हक्क

पुरुषांचा सुधारक सन्मान पुरस्कार

दै. सिंहवाणी वृत्त, कोरडी

मिलिंद गाडेकर

महाराष्ट्र शासनाचे महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत कार्यरत असलेल्या आस्था लोकसंचालित साधन केंद्र नागपूर ग्रामीण व कामठी तालुका यांचेवतीने नवतेजशस्विनी ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प अंतर्गत तालुकास्तरीय मासिक मित्र मंडळातील पुरुषांचा महादूला नगर पंचायत ग्राम गीता सभागृह येथे आयोजित कार्यक्रमात स्त्री पुरुष समानतेवर प्रशिक्षण देण्यात आले.

यावेळी स्त्री पुरुषांचे राजकीय, आर्थिक, सामाजिक शेक्षणिक, समानतेवर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आस्था लोकसंचालित साधन केंद्राच्या अध्यक्षा नलुताई मेश्राम, प्रमुख पाहुणे म्हणून नगर पंचायत महादूल्याचे माजी नगराध्यक्ष राजेश रंगारी, महिला आर्थिक विकास महामंडळाचे सहाय्यक जिल्हा समन्वय अधिकारी मोहन घनोटे, सहनियंत्रण अधिकारी मकशुद शेख, हँड इन हँड संस्थेचे जिल्हा समन्वय अधिकारी मोशमी शेख गुरुदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रकाश भालेराव उपस्थित होते.

श्री मोहन घनोटे यांनी स्त्री पुरुष समानता समाजात का गरजेची आहे यावर मार्गदर्शन केले.



आस्था लोकसंचालित साधन केंद्राच्या व्यवसस्थापिका करुणा मनघटे, यांनी मार्गदर्शन व संचालन केले. यावेळी मासिम मित्र मंडळातील पुरुषांचा तालुका स्तरीय सुधारक सन्मान पुरस्कार देऊन स्मृती चिन्ह शाल श्रीफळने सत्कार करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वीते करिताअंकित झंझाड, लोकेश आंबाडरे, स्मिता मानकर, वर्षा भांडे, लता सोनवणे ,सुरेखा गोंडाने, छाया आताग्रे, सुजाता पानतावणे, सुनीता वानखेडे, यांनी सक्रिय सहभाग घेतला. तसेच महिलांना विकासकार्यात आणि त्यांचे नेतृत्वाला पंख मिळावे म्हणून ज्या सदपुरुषांनी प्रोत्साहन दिले त्यापैकी गुरुदेव सेवाधिकारी कामठी तालुक्यातील प्रकाश भालेराव, लक्ष्मण मनघते, अशोक कुथे, नानाभाऊ लांडे, शुक्लाजी, गुरुदेव सेवाग्राम मधील ज्येष्ठ नागरिकांचा यावेळी मोमेट्रो देऊन सत्कार करण्यात आला.

डॉ. उर्वशी खेकरे यांना वेल्लोर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथून पीएच .डी.

दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

वेल्लोर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथून डॉ. उर्वशी गणेश खेकरे (धनरे) यांनी पीएच.डी. पदवी यशस्वीरीत्या संपादन केली.



इलेक्ट्रिक वाहनांच्या बॅटरी व्यवस्थापन प्रणालीवर आधारित संशोधनासाठी त्यांना ही पदवी प्रदान करण्यात आली.

'अॅन इंटिलिजंट हायब्रीड बॅटरी मॅनेजमेंट सिस्टिम फॉर इलेक्ट्रिक व्हेइकल यूजिंग डीप रिइन्फोर्समेंट लर्निंग बेस्ड रेंज प्रेडिक्शन अँड चार्जिंग ऑप्टिमायझेशन' हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता. हे संशोधन त्यांनी व्हीआयटी, वेल्लोर येथील डॉ. राजय वेदाराज यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले. डॉ. उर्वशी यांचे शालेय शिक्षण,रामटेक, अभियांत्रिकी आणि एम.टेक.चे शिक्षण किट्स रामटेक येथून पूर्ण केले. त्यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल धनरे परिवार, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

निवृत्तीवेतनधारकांसाठी मोबाईल ॲपद्वारे हयात प्रमाणपत्र सादर करण्याची सुविधा, निवृत्तीवेतनधारकांसाठी महामेळावा

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

निवृत्ती वेतन धारकांचे जीवन अधिक सुलभ व सुकर व्हावे यासाठी चेहरा प्रमाणीकरण तंत्रज्ञानाच्या माध्यमातून त्यांना सहजगत्या डिजिटल हयात प्रमाणपत्र सादर करण्याची सुविधा निर्माण झाली आहे. निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनी या प्रक्रियेचा लाभ घ्यावा व आपले हयात प्रमाणपत्र वेळेत प्राप्त करून घ्यावे, असे आवाहन भारत सरकारच्या निवृत्तीवेतन व निवृत्तीवेतनधारक कल्याण विभागाचे संचालक प्रमोद कुमार कौशिक यांनी आज येथे केले.

राज्य शासकीय निवृत्ती वेतन धारक व कुटुंब निवृत्ती वेतन धारकांसाठी देशव्यापी डिजिटल जीवन प्रमाणपत्र अभियानांतर्गत नियोजन भवन येथे विशेष महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.



वरिष्ठ कोषागार कार्यालयातर्फे आयोजित महामेळाव्यास लेखा व कोषागारे सहसंचालक ज्योती भोंडे, वरिष्ठ कोषागार अधिकारी अमित मेश्राम, कुशावर अधिकारी मोनाली भोयर, अपर कोषागार अधिकारी शुभांगी धुर्वे यांच्यासह उपमहालेखापाल श्री नागराजन, भारतीय स्टेट बँक, बँक ऑफ इंडिया व बँक ऑफ महाराष्ट्राचे उपमहाव्यवस्थापक शशी रंजन, अरूप पात्रा व अनंत कुमार गाडे उपस्थित होते.

श्री कौशिक म्हणाले, हे अभियान केवळ प्रमाणपत्र जमा करण्यापुरते मर्यादित नसून या माध्यमातून निवृत्ती वेतन धारकांमध्ये डिजिटल सुविधांविषयी जागरूकता निर्माण करण्यात येत आहे. या सुविधांचा प्रत्यक्ष वापर त्यांना करता यावा हा या अभियानाचा उद्देश असून विशेषतः जेष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती तसेच शारीरिक दृष्ट्या असमर्थ निवृत्त वेतनधारकांना आवश्यक ती मदत वामुळे होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

श्री कौशिक यांनी निवृत्तीवेतनधारकांना मोबाईल ॲपद्वारे डिजिटल जीवन प्रमाणपत्र तयार करताना येणाऱ्या समस्या जाणून घेतल्या. निवृत्तीवेतनधारकांशी संवाद साधत त्यांनी मार्गदर्शन केले.

या महामेळाव्यात सहभागी झालेले निवृत्ती वेतनधारक व कुटुंब निवृत्ती वेतनधारकांचे ऑनलाइन हयात प्रमाणपत्र तयार करून देण्यात आले. चेहरा प्रमाणीकरणाच्या सुविधेद्वारे ही प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून, याबाबत जिल्हा कोषागार कार्यालयाकडून या प्रक्रियेबाबत सादरीकरण व मार्गदर्शन करण्यात आले. डिसेंबर-२०२६ चे निवृत्तीवेतनाची प्रक्रिया पार पडण्यासाठी ऑनलाइन हयात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असल्याने हा महामेळावा महत्त्वाचा ठरला असून सर्व पात्र निवृत्ती वेतनधारकांनी या सुविधेचा लाभ घेतला.

यावेळी कोषागारातील वरिष्ठ अधिकारी, बँक प्रतिनिधी, निवृत्तीवेतनधारक संघटनांचे पदाधिकारी व निवृत्ती वेतनधारक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

थोडक्यात

उमरेडच्या गाव तलावात ७० वर्षीय महिलेचा मृतदेह आढळला



दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड

उमरेड येथील गाव तलावात शनिवार, २१ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजताच्या सुमारास एका ७० वर्षीय महिलेचा मृतदेह आढळून आला. कुसुमबाई शालिकराम मानकर वय ७०, रा. मानोरा, ता. भिवापूर, जि. नागपूर असे मृत महिलेचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कुसुमबाई मानकर यांचे पती वनविभागात वनरक्षक म्हणून कार्यरत होते. त्यांचे पूर्वीच निधन झाले असून, पतीच्या निधनानंतर कुसुमबाई यांना पतीची निवृत्तीवेतनाची रक्कम मिळत होती. त्या आपल्या मूळ गावी मानोरा येथे कायमस्वरूपी राहत नसून नातेवाईकांकडे वेगवेगळ्या ठिकाणी काही दिवस वास्तव्यास राहत होत्या. कधी दिघोरी (नागपूर), कधी पाचगाव तर कधी गावसुत येथे त्या १० ते १५ दिवस राहत असल्याची माहिती आहे.

मृतकाच्या बहिणीच्या मुलाने दिलेल्या माहितीनुसार, कुसुमबाई या शुक्रवार, २० नोव्हेंबर रोजी दुपारी २ वाजता दिघोरी, नागपूर येथून उमरेड येथे येण्यासाठी निघाल्या होत्या. उमरेड येथे त्यांचे नातेवाईक राहत असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, शनिवार, २१ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजताच्या सुमारास उमरेड येथील गाव तलावात त्यांचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच संबंधितांनी घटनास्थळी धाव घेतली. या घटनेबाबत पुढील चौकशी सुरू असून, महिलेचा मृत्यू नेमका कोणत्या कारणाने झाला, याबाबत अधिकृत माहिती तपासानंतर स्पष्ट होणार आहे. बहिणलेक - नंदकिशोर मुरलीधर शहाणे वय ४० वर्ष रा.पाचगाव येथे मृतकावर अंत्यविधी होणार असल्याची माहिती त्यांच्या कुटुंबियांकडून देण्यात आली आहे

उमरीजवळ मध्यरात्री भीषण अपघात.

रानडुक्कर आडवे आल्याने कार डिव्हायडरला धडकली, तिघे जखमी



दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

पोलीस स्टेशन केळवद हद्दीतील उमरी गावाजवळ शनिवार, दिनांक २१ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री १ वाजताच्या सुमारास अपघाताची घटना घडली. अचानक रानडुक्कर रस्त्यावर आडवे आल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि कार थेट डिव्हायडरला जाऊन धडकली. मिळालेल्या माहितीनुसार, कार क्रमांक MP 28 ZT 0963 ही सावनेरकडून पांढुर्णा दिशेने जात असताना उमरीजवळ अचानक रानडुक्कर आडवे आले. त्यामुळे चालकाचे नियंत्रण सुटून कार डिव्हायडरवर जाऊन धडकली. या अपघातात दोघे जखमी झाले असून, एकाला किरकोळ दुखापत झाली आहे.

या अपघाताची माहिती सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांना सोहेल शेख यांनी दिली. माहिती मिळताच हितेश बनसोड यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. घटनेची माहिती त्यांनी पोलीस निरीक्षक आशिषसिंग ठाकूर तसेच महामार्ग पोलिसांना दिली. हितेश बनसोड यांच्या मदतीने जखमींना पुढील उपचारासाठी रुग्णालयात रवाना करण्यात आले. अपघातातील संबंधित व्यक्ती भूषण दिडमीसे, वय २० वर्षे, रा. येलकपार, जिल्हा पांढुर्णा.,परसराम काकडे, वय ४० वर्षे, रा. सौसर.किरकोळ जखमी रामकृष्ण फिडकेकार, वय २६ वर्षे, रा. येलकपार.असे असून त्यांच्यावर उपचार सुरू आहे. रात्रीच्या वेळी जंगल परिसरातून प्रवास करताना रानडुक्कर व इतर वन्यप्राणी अचानक रस्त्यावर येण्याची शक्यता असते. त्यामुळे वाहनचालकांनी वेगावर नियंत्रण ठेवून सावधगिरीने वाहन चालवावे.तसेच अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सदैव तत्पर हितज्येती आधार फाउंडेशन टीम चे संस्थापक हितेश बनसोड व त्यांचे सहकारी यांना संपर्क करावे असे आव्हान केले आहे.

मनपातर्फे महर्षी सुदर्शन महाराज जयंती उत्साहात साजरी करा : उपमहापौर लिला हाथीबेड

मनपा मुख्यालयासह सर्व झोन कार्यालयांमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्याचे निर्देश

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर महानगरपालिकेतर्फे मंगळवार २४ नोव्हेंबर रोजी महर्षी सुदर्शन महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात यावी, असे आवाहन उपमहापौर श्रीमती लिला हाथीबेड यांनी केले. महर्षी सुदर्शन महाराज जयंतीच्या आयोजनासंदर्भात शनिवारी(ता.२१) मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहात पार त्यांनी हे आवाहन केले. याप्रसंगी मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ.गजेंद्र महल्ले, सहायक आयुक्त प्रमोद वानखेडे, धनंजय जाधव, राजेश मेश्राम आणि सर्व झोनचे झोनल अधिकारी उपस्थित होते.

यावेळी त्यांनी महानगरपालिकेच्या मुख्यालयासह सर्व झोन कार्यालयांमध्ये जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमांचे आयोजन करून महर्षी सुदर्शन महाराज यांच्या विचारांचे आणि कार्याचे स्मरण करण्यात यावे, असे सांगितले. तसेच बैठकीत उप महापौर श्रीमती लिला हाथीबेड यांनी महर्षी सुदर्शन महाराज यांचे सामाजिक आणि आध्यात्मिक योगदान समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांचा प्रसार व्हावा आणि नव्या पिढीला त्यांच्या कार्याची ओळख व्हावी, या उद्देशाने महानगरपालिकेच्या सर्व स्तरांवर जयंती उत्साहात साजरी करण्याचे आवाहनही उपमहापौरांनी केले. तसेच जयंती सोहळ्याच्या आयोजनासाठी संबंधित विभागांनी समन्वय साधून आवश्यक ती तयारी करावी, असेही त्यांनी सूचित केले.

पारशिवनीत ३०५ शेतकऱ्यांना झटका मशीनचे वितरण

खत बचाव अभियान कार्यक्रमात कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांचे प्रतिपादन; कृषी विकासाचा पुढील २० वर्षांचा रोडमॅप तयार

दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी



आत्मा (कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा) व कृषी विभाग, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'खत बचाव अभियान' कार्यक्रम शनिवार, दि. २१ नोव्हेंबर २०२६ रोजी पारशिवनी येथील अमन सभागृहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी राज्यमंत्री अँड. आशिष जयस्वाल होते. यावेळी त्यांनी डॉ. पंजाबराव देशमुख व भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच वन्यप्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी राज्यमंत्री जयस्वाल यांच्या हस्ते ३०५ लाभार्थी शेतकऱ्यांना झटका मशीनचे वितरण करण्यात आले.

यावेळी उपस्थित शेतकरी बांधवांशी संवाद साधताना राज्यमंत्री अँड. आशिष जयस्वाल म्हणाले की, रामटेक आणि पारशिवनी तालुक्यांतील वनक्षेत्रालगतची जवळपास ३० ते ४० गावे वन्यप्राण्यांच्या उपद्रवामुळे बाधित आहेत. अपुऱ्या सिंचन सुविधा, पावसावर अवलंबून असलेली शेती आणि रात्रीच्या वेळी वन्यप्राण्यांकडून होणारे पिकांचे नुकसान यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. यामुळे मानव-वन्यजीव संघर्षाचाही प्रश्न निर्माण होत आहे. या पार्श्वभूमीवर झटका मशीनचे वितरण करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, शेती अधिक सक्षम करणे आणि नैसर्गिक संकटांपासून त्यांचे संरक्षण करणे हे आपले प्रमुख उद्दिष्ट असून, त्यासाठी पुढील वीस वर्षांचा कृषी विकासाचा रोडमॅप तयार करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकार शेतकऱ्यांच्या हितासाठी सातत्याने कार्यरत आहे, असेही त्यांनी सांगितले.

मागेल त्याला सौर कृषी पंप, मागेल त्याला शेततळे, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प तसेच कृषी पंपांसाठी वीजपुरवठा अशा विविध योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सिंचनाच्या शाश्वत सुविधा उपलब्ध करून देण्यावर शासनाचा भर आहे. बदलते हवामान आणि भविष्यातील पाणीटंचाईचे आव्हान लक्षात घेता जलसंधारणाच्या कामांनाही प्राधान्य दिले जात आहे. रामटेकमध्ये सुरू केलेल्या तोडपरी बंधाऱ्यांच्या उपक्रमाचा विस्तार करून विविध ठिकाणी वन्यप्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी सौरकुंपण उभारण्याचे नियोजन असून, कमी खर्चात पाणीसाठा निर्माण करण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

कृषी राज्यमंत्री म्हणून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना न्याय देणे आणि कृषी क्षेत्र अधिक समृद्ध करणे ही आपली जबाबदारी असून, शेतकऱ्यांच्या सर्वांगीण कल्याणासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

कार्यक्रमाला पारशिवनी नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष सुनिताताई डोमकी, उपाध्यक्ष दीपक शिवरकर, तहसीलदार वाघचौरे, प्रभारी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी (नागपूर) अर्चना कडू, शिवसेना उपजिल्हाप्रमुख वर्धराज पिल्ले, नगरसेवक रोशन पिंपरामुळे, प्रकाश डोमकी, माजी नगराध्यक्ष प्रतिभाताई कुंभलकर, प्रेम भोंडेकर, राहुल ढगे, राहुल मेंघर, राजेश गोमकाळे, हर्षवर्धन निकोसे, विजय भुते,गटविकास अधिकारी जाधव यांच्यासह अन्य मान्यवर, अधिकारी आणि मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते.

वन्यप्राण्यांपासून पिकांचे संरक्षण होणार

सोमवार २३ नोव्हेंबर रोजी रंगणार भक्तीचा 'महापौर कीर्तन महोत्सव', रांगोळी स्पर्धा, भव्य दिंडी आणि सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. श्री. सोपानदादा कानेरकर यांचे कीर्तन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : शहरातील सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेला प्रोत्साहन देण्यासोबतच भक्तीभाव, वारकरी संप्रदायाची परंपरा आणि सामाजिक एकोपा वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने नागपूर महानगरपालिकेच्या वतीने महापौर निता ठाकरे यांच्या नेतृत्वात सोमवार २३ नोव्हेंबर रोजी 'महापौर कीर्तन महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. रमणा मारोती मंदिर येथे सायंकाळी ६ वाजता कीर्तन महोत्सवाला प्रारंभ होणार असून, यावेळी सुप्रसिद्ध कीर्तनकार ह. भ. प. श्री. सोपानदादा कानेरकर यांचे कीर्तन होणार आहे. त्यांच्या कीर्तनातून भक्ती, अध्यात्म आणि वारकरी संप्रदायातील विचारांचा जागर घडणार आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून नागरिकांना भक्तिमय वातावरणात कीर्तन, दिंडी आणि विविध सांस्कृतिक उपक्रमांचा अनुभव घेता येणार आहे.

या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री आशिष जैस्वाल, आमदार अभिजीत वंजारी, सुधाकर अडबाले, डॉ. परिणय फुके, कृपाल तुमाने, संजय भेंडे, डॉ. राजीव पोतदार, आमदार सर्वश्री डॉ. नितीन राऊत, कृष्णा खोपडे, प्रवीण दटके, मोहन मते, विकास ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. याशिवाय विशेष मान्यवर म्हणून उपमहापौर लीला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर, विरोधी पक्षनेते संजय महाकाळकर, मनपा आयुक्त डॉ. विपीन, अतिरिक्त आयुक्त अंकित, मुरगानंथम एम., मिलिंद मेश्राम, क्रीडा विशेष समिती सभापती दर्शनी धवड, झोन सभापती सीमा ढोमणे, एआयएमआयएमचे गटनेते शकील पटेल, इंडियन मुस्लिम लीगचे गटनेते असलम खान मुल्ला, शिवसेना (उबाठा)चे गटनेते किशोर कुमेरिया, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)च्या गटनेत्या आभा पांडे, बहुजन समाज पक्षाच्या गटनेत्या हर्षला जैस्वाल, शिवसेनेचे गटनेते गणेश चार्लेवार, नगरसेवक विजय (पिंटू) झलके आणि नगरसेविका मंगला कावरे यांची उपस्थिती राहणार आहे. अशी माहिती उपायुक्त मंगेश खवले आणि क्रीडा अधिकारी डॉ. पियुष आंबुलकर यांनी दिली.

नितीन गडकरी यांच्या हस्ते हल्दीराम विदर्भ दिव्यांग प्रीमियर लीगच्या ट्रॉफीचे अनावरण

विदर्भातील ११ जिल्ह्यांतील दिव्यांग क्रिकेटपटूंचा स्पर्धेत सहभाग



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

विदर्भातील दिव्यांग क्रिकेटपटूंना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने विदर्भ दिव्यांग क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित द्वितीय 'हल्दीराम विदर्भ दिव्यांग प्रीमियर लीग (व्हीडीपीएल) २०२६' च्या ट्रॉफीचे अनावरण केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी स्पर्धेच्या आयोजनाला शुभेच्छा दिल्या. विदर्भातील ११ जिल्ह्यांतील खेळाडू या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. ट्रॉफी अनावरणप्रसंगी भारतीय दिव्यांग क्रिकेट संघाचे माजी कर्णधार व आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू गुरुदास राऊत, आंतरराष्ट्रीय क्रिकेट प्रशिक्षक धनंजय उपासनी, संस्थेचे ज्येष्ठ पदाधिकारी नूतन उमरेडकर, संजय भोसकर, बाबुराव यादव, राहुल लेकुरवाळे, सचिन पाखरे, जनक साहू, प्रशांत गौरकर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. वावेळी विदर्भ दिव्यांग क्रिकेट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी नितीन गडकरी यांचे आभार मानले.

दिव्यांग क्रिकेटमधील नवोदित खेळाडूंना प्रोत्साहन देणे, त्यांना स्पर्धात्मक व्यासपीठ उपलब्ध करून देणे, क्रीडेमधून सामाजिक समावेशनाला चालना देणे आणि गुणवंत खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर आपली ओळख निर्माण करण्याची संधी देणे, हा या लीगचा मुख्य उद्देश आहे. या स्पर्धेचे मुख्य प्रायोजक हल्दीराम असून, विश्वराज ग्रुप सहप्रायोजक आहे. माध्यम प्रायोजक म्हणून लोकसेवा प्रतिष्ठानचे सहकार्य लाभले आहे. तसेच डी. वाय. पाटील क्रिकेट अकादमी, दिल्ली पब्लिक स्कूल, मिहान, श्रीवास्तव अँड असोसिएट्स प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट, संदीप डेव्हलपर्स प्रा. लि., एनआयइ प्रोजेक्ट, तापण्या टायगर रिसॉर्ट, ए. के. रिअल इस्टेट आणि व्हीआरएल मल्टिपर्पज क्रिएशन यांचे सहकार्य लाभले आहे.

औद्योगिक प्रशिक्षण संस्था सावनेर येथे पदवीदान समारंभ उत्साहात संपन्न

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर



येथील स्व. अण्णाजी कुबितकर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रशिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा पदवीदान समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

या समारंभात प्रशिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. संस्थेतुन प्रथम क्रमांक सुजल बघेल, मेकॅनिक डिझेल (९९%),द्वितीय दक्षराज पाटील, विजतंत्री (९७.८३%), तृतीय गणेश चौधरी,मेकॅनिक डिझेल (९७.६३%) तथा संस्थेत प्रशिक्षणासाठी उपलब्ध असलेल्या सर्व दहा व्यवसायातील प्रथम तीन प्रशिक्षणार्थ्यांना पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांचा चेहऱ्यावर आनंद, उत्साह व समाधानाचे भाव दिसून येत होते.

कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संस्थेचे गटनिदेशक मानेकर सर, व बोकडे सर यांनी कौशल्याधारित शिक्षणाची गरज आणि बदलत्या औद्योगिक क्षेत्रातील रोजगाराच्या संधी याविषयी माहिती दिली. विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या तांत्रिक ज्ञानाचा उपयोग स्वतःच्या प्रगतीसोबतच देशाच्या औद्योगिक विकासासाठी करावा, असे आवाहन करण्यात आले.

यावेळी संस्थेचे प्राचार्य कावडकर सर, निदेशक भोयर सर, मालेकर सर, पुसाम सर, गेडाम सर, अंबादे, मुंधे सर,राठोड मॅडम, सिमा राठोड मॅडम, गडदरे मॅडम कर्मचारीवृंद तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रविंद्र लोही यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कटरे सर, भुरे सर, सहारे सर व संस्थेतील कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचा समारोप आभार प्रदर्शन व राष्ट्रीय गीत गायनाने करण्यात आला.

किन्हाळ्यात कबड्डी स्पर्धेचा थरार, सिर्सीच्या एकता क्रीडा मंडळाचा विजयी डंका

दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड



जय हनुमान क्रीडा मंडळ, किन्हाळा (सिर्सी) यांच्या वतीने आयोजित ५८ किलो वजन गटातील एकदिवसीय भव्य कबड्डी स्पर्धा गुरुवारी (१९ नोव्हेंबर) हनुमान मंदिराच्या पटांगणावर उत्साहात पार पडली. विविध ठिकाणांहून आलेल्या संघांनी सहभाग घेतल्याने दिवसभर मैदानावर चुरशीच्या लढती रंगल्या.

खेळाडूंच्या दमदार पकडी, आक्रमक चढाया, चपळाई आणि अचूक डावपेचांनी स्पर्धेत रंगत आणली. विजयासाठी खेळाडूंनी शेवटच्या क्षणापर्यंत झुंज दिल्याने उपस्थित क्रीडाप्रेमींना उत्कंठावर्धक सामने पाहण्याची पर्वणी मिळाली.

स्पर्धेला उमरेड विधानसभा क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्ते राजूभाऊ मेश्राम यांची प्रमुख उपस्थिती लाभली. ग्रामीण भागातील युवकांनी मैदानी खेळांकडे वळून क्रीडा क्षेत्रात आपले भविष्य घडवावे, तसेच नवोदित खेळाडूंना योग्य संधी व प्रोत्साहन मिळावे, यासाठी अशा स्पर्धांचे आयोजन महत्त्वाचे असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमाला राजूभाऊ सुटे, माजी सभापती, जिल्हा परिषद नागपूर; वंदना बुटे, सरपंच, ग्रामपंचायत सिर्सी; शालुताई प्रधान, ग्रामपंचायत अधिकारी आणि रूपेश घरत, सामाजिक कार्यकर्ता यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

अटीतटीच्या सामन्यांनंतर स्पर्धेतील विजेता संघ

प्रथम क्रमांक एकता क्रीडा मंडळ-सिर्सी, द्वितीय क्रमांक विजासन धाम क्रीडा मंडळ, संकलनपूर मध्य प्रदेश, तृतीय क्रमांक स्व. हरिओम कोहळे मित्रपरिवार-आर्वी, चतुर्थ क्रमांक जय हनुमान क्रीडा मंडळ, किन्हाळा आला.

मोबाईलच्या वाढत्या वापरामुळे युवकांचा मैदानी खेळांकडे कल कमी होत असताना अशा स्पर्धांमधून युवकांना क्रीडा क्षेत्राकडे वळण्याची प्रेरणा मिळत आहे. शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त, जिद्द आणि संघभावना विकसित करण्यासाठी कबड्डीसारख्या मैदानी खेळांचे महत्त्व या स्पर्धेतून अधोरेखित झाले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सुधीर खेडकर, सुभाष पाटील, देवराव सपाट, गजानन पाटील, साहेबराव किरडे, रमेश पाटील, हरिदास पाटील, आकाश देवतळे, दशरथ दुधानकर, बादल नागपुरे, राकेश कोल्हे, सूरज पाटील, पंकज नेंडीकर, विक्रम देवतळे, गौरव रायफुले, सुजल राऊत, निखिल नायतम, आकाश राऊत, सेवक नागपुरे, निखिल सातपु, निखिल नागपुरे, मंथन देवतळे, आदित्य झाडे, ओम कामठे, शिवा जुगनाके, राकेश दुधानकर, प्रज्वल सातपु व साहिल बेले यांनी परिश्रम घेतले.

वाचकांच्या प्रेमाने बहरला 'दीपरंग-२०२६'



दैनिक सिंहवाणी वृत्तच्या 'दीपरंग-२०२६' दिवाळी अंक तसेच विशेषांकाचे अवलोकन करताना राज्याचे माजी मंत्री, आमदार सुधीर मुनगंटीवार व उपस्थित चंद्रपूर जिल्हा प्रतिनिधी धनंजय पांढरे


महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. मिलींद नारिंगे


वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी)चे व्यवस्थापकीय संचालक श्री. प्रशांत वावगे यंना 'दीपरंग-२०२६' भेट देताना ज्येष्ठ पत्रकार - लेखक श्याम पेठकर


उपविभागीय पोलिस अधिकारी पांडुरंग सोनवणे यांनी दैनिक सिंहवाणी वृत्तच्या मुख्य कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांना 'दीपरंग-२०२६' भेट देताना.


महावितरणचे उपमुख्य जनसंपर्क अधिकारी श्री. योगेश विटनकर


सहाय्यक संचालक (माहिती) विभागाचे श्री. अतुल पांडे


हल्दीराम फुड प्रोडक्टचे अधिकारी श्री. राव


स्पेक्ट्रम ॲडव्हरटाईजमेंट व इव्हेंटचे संचालक श्री. प्रमोद कोरडे यांना 'दीपरंग-२०२६' भेट देताना


अनुप पब्लिसिटीचे संचालक श्री. निलेश राठी


दृष्टी कम्युनिकेशचे संचालक श्री. संजय चिंचोळे


हरडे असोसिएट्सचे श्री. धनराज विठ्ठलराव हरडे


वेदसुरक्षा प्रतिष्ठानचे संचालक श्री. तुषार घोरमाडे


कल्पना ज्वेलर्सचे संचालक श्री. अमित खुबाळकर


शार्प इन्स्ट्रूमेंट, नागपुरचे संचालक श्री. शंकर सालोडकर व सौ. सालोडकर


लेखक श्री. लिलाधर दवंडे जि. नागपूर


लता मंगेशकर रूग्णालयाचे श्री. जितेंद्र मुळे


दक्षिण नागपुरचे सामाजिक कार्यकर्ता श्री. गिरीश पांडव


लेखक शशिकांत तोटे, जि. यवतमाळ


लेखक सुधाकर जाधव, जि. अमरावती


लेखक प्रा. भरत खैरकर, जि. पुणे


लेखक श्री. महेश वैजापूरकर डोंबिवली, मुंबई


प्रशांत डेकोअर, नागपूरचे संचालक श्री. प्रशांत धावंडे

दीपरंग २०२६

कार्तिक पौर्णिमा : भारतीय संस्कृतीतील भक्ती, श्रद्धा, परंपरा आणि प्रकाशाचा मंगलमय उत्सव

भारतीय संस्कृती ही सण, उत्सव, धार्मिक परंपरा आणि आध्यात्मिक विचारांनी समृद्ध आहे. प्रत्येक सणामागे काहीतरी पौराणिक महत्त्व, सामाजिक संदेश आणि जीवनाला सकारात्मक दिशा देणारा विचार दडलेला असतो. असाच एक पवित्र आणि मंगलमय सण म्हणजे कार्तिक पौर्णिमा. हिंदू धर्मात कार्तिक महिन्याला विशेष महत्त्व आहे. या महिन्यातील पौर्णिमा अत्यंत पवित्र मानली जाते. कार्तिक पौर्णिमेला त्रिपुरारी पौर्णिमा, त्रिपुरी पौर्णिमा आणि देव दिवाळी या नावांनीही ओळखले जाते. श्रद्धा, भक्ती, दीपदान आणि मांगल्य यांचा सुंदर संगम या दिवशी पाहायला मिळतो.

त्रिपुरासुर वध आणि त्रिपुरारी पौर्णिमेची पौराणिक कथा

पौराणिक कथेनुसार, त्रिपुरासुर नावाच्या बलाढ्य दैत्याने आपल्या सामर्थ्याच्या जोरावर देवतांना आणि सामान्य जनतेला त्रास देण्यास सुरुवात केली होती. त्याच्या अत्याचारांमुळे संपूर्ण सृष्टीमध्ये भय आणि अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले. त्रिपुरासुराच्या जाचातून मुक्त होण्यासाठी देवतांनी भगवान महादेवांची प्रार्थना केली. देवतांची विनंती मान्य करून भगवान शंकरांनी त्रिपुरासुराचा वध केला. या विजयामुळे देवतांना आनंद झाला. हा विजय कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी मिळाल्यामुळे या दिवसाला त्रिपुरारी पौर्णिमा असे नाव प्राप्त झाले, अशी धार्मिक श्रद्धा आहे.

त्रिपुरासुराचा वध करून भगवान शंकरांनी अधर्मावर धर्माचा, अन्यायावर न्यायाचा आणि वाईट प्रवृत्तींवर चांगल्या प्रवृत्तींचा विजय मिळवून दिला. ही कथा आपल्याला जीवनातील वाईट विचार, अहंकार, अन्याय आणि दुष्ट प्रवृत्तींचा त्याग करण्याची प्रेरणा देते.

देव दिवाळी आणि दीपदानाचे महत्त्व

कार्तिक पौर्णिमेला देव दिवाळी असेही म्हटले जाते. या दिवशी देवतांनी दीपोत्सव साजरा केला, अशी धार्मिक मान्यता आहे. त्यामुळे या दिवशी दिवे लावण्याला विशेष महत्त्व आहे. घरातील देवघर, मंदिर परिसर, अंगण आणि नदीचे घाट असंख्य दिव्यांनी उजळून निघतात. विशेषतः नदीकिनारी होणारे दीपदान हे या उत्सवाचे आकर्षण असते.

दिवा हा केवळ प्रकाश देणारा घटक नसून तो ज्ञान, आशा, सकारात्मकता आणि मांगल्याचे प्रतीक आहे. एक छोटासा दिवा जसा अंधार दूर करतो, त्याचप्रमाणे ज्ञानाचा प्रकाश माणसाच्या जीवनातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि नकारात्मकता दूर करू शकतो. दीपदानामागील हाच सुंदर विचार आपल्या जीवनात रुजविण्याची गरज आहे.

धार्मिक विधी आणि परंपरा

कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी पहाटे लवकर उठून पवित्र स्नान करण्याची परंपरा आहे. या दिवशी भगवान विष्णू, भगवान शंकर आणि कार्तिकेय यांची पूजा केली जाते. मंदिरांमध्ये अभिषेक, आरती, भजन, कीर्तन आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. अनेक भाविक उपवास करतात, दानधर्म करतात आणि गरजू व्यक्तींना अन्न, वस्त्र तसेच आवश्यक वस्तूंचे दान देतात. कार्तिक महिन्यातील स्नान, दीपदान आणि दानधर्म यांना धार्मिकदृष्ट्या पुण्यकारक मानले जाते. या दिवशी तुळशीपूजनालाही महत्त्व आहे. काही ठिकाणी मंदिरांमध्ये विशेष सजावट केली जाते. भक्तिमय वातावरणात संपूर्ण परिसर मंगलमय होतो.

भारतीय संस्कृती आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश

कार्तिक पौर्णिमा हा केवळ धार्मिक विधींचा दिवस नाही, तर समाजातील एकता, बंधुभाव आणि माणुसकी जपण्याची आठवण करून देणारा उत्सव आहे. भारतातील विविध प्रांतांमध्ये हा सण वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. महाराष्ट्रात त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त मंदिरांमध्ये दीपमाळा प्रज्वलित केल्या जातात. अनेक ठिकाणी दीपोत्सवाचे आयोजन केले जाते. वाराणसीसारख्या पवित्र नगरीत देव दीपावलीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या दिवशी समाजातील सर्व घटक एकत्र येऊन आनंद आणि भक्तिभाव व्यक्त करतात. अशा सणांमुळे आपल्या परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचतात. कुटुंबातील सदस्य एकत्र येतात, सामाजिक नाती दृढ होतात आणि संस्कृतीविषयी आदर निर्माण होतो.

निसर्गसंवर्धन आणि पर्यावरणपूरक उत्सवाची गरज

आजच्या आधुनिक युगात सण साजरे करताना पर्यावरणाचे भान ठेवणेही तितकेच आवश्यक आहे. दीपोत्सव साजरा करताना मातीच्या पणत्यांचा वापर करावा. नदी, तलाव आणि जलस्रोतांमध्ये प्लास्टिक, कचरा किंवा पर्यावरणाला हानी पोहोचवणाऱ्या वस्तू टाकू नयेत.

- सौ. माधुरी धनोकार, अकोला